UNIVERSAL LIBRARY
OU_192875
UNIVERSAL LIBRARY

OSMANIA UNIVERSITY LIBRARY

Call No. M83 P89A Accession No. M 4053

Author प्रफुल्ल दत्त

Title अनोखी फूलें

This book should be returned on or before the date last marked below.

# अशोकाचीं फुलें

प्रफुल्ल-दत्त

लाखाणी बुक डेपो, मुंबई ४

किंमत दीड रुपया

प्रकाशक :

लाखाणी बुक डेपो,

गिरगांव, मुंबई ४

प्रथमावृत्ति डिसेंबर १९५३

सर्व हक्क लेखकाधीन

मुद्रक :

वि. पु. भागवत,

मौज प्रिंटिंग ब्यूरो,

गिरगांव, मुंबई नं. ४

माझे ऋणानुबंधी

**श्री. मंगेश ग. तेंडुलकर**

आणि

**श्री. पुरुषोत्तम बा. सिनकर**

यांस कृतज्ञतापूर्वक

# अशोकाचीं फुलें

सुप्रसिद्ध कवि प्रफुल्ल-दत्त यांचा हा एक आकर्षक गद्य-गुच्छ आहे. एकमेकांनीं आकर्षून घेतलेल्या पण अन्यत्र विवाहबद्ध झाल्यानें झुरणाऱ्या तरुण-तरुणींचीं मोटीं मोहक शब्द-चित्रें कवीनें आपल्या नादमधुर व आकर्षक शैलीनें येथें सजविलेलीं आहेत. तरुण-तरुणींच्या परस्परविषयक आकर्षणाला व तें विफल झाल्यानें होणाऱ्या विव्हलतेला अनेक निरनिराळे पैलू असतात. अशा सत्तावन पैलूंचें शब्द-चित्र रेखाटण्यास कवीची कल्पनाशक्ति व्यापक असावी लागते. तशी ती 'अशोकाच्या फुलांत' विहरत असल्यानें प्रेमविव्हल-तेच्या गुंफणींतील अनेक सूक्ष्म धागेदोरे ती कोमल हस्तानें उलगडून दाखवीत आहे. एकट्या तरुणाच्या किंवा एकट्या तरुणीच्या नव्हे तर दोघांच्याहि मानसिक विव्हलतेचीं अनेक पुष्पें येथें गुंफलेलीं आहेत. यामुळें आडव्या उभ्या सुंदर धाग्यादोऱ्यांनीं विणलेल्या सुवर्ण वस्त्राप्रमाणें हा 'अशोकाच्या फुलां'चा हार मोठा मनोवेधक उतरलेला आहे.

—प्रा. द. के. केळकर

( रुइया कॉलेज )

## १. महाश्वेता

त्या दिवशीं रात्रीं बराच वेळ मी 'महाश्वेता' या बंगाली कादंबरीचा अनुवाद वाचीत पडलों होतों. मध्यरात्र उलटली, भोंवतालचं जग निद्रावश झालं, तरी माझं मन कथानकाच्या ओघांतून बाहेर पडेना. शेवटीं शेजारच्या घरीं मंगळागौरीला जमलेल्या मुलींच्या झिम्मा-फुगडीनं आणि पकव्या-गाण्यानं मी बेचैन होऊन गवाक्षांत येऊन उभा राहिलों.

श्रावणांतील घनमालांनीं आच्छादलेली सारी रात्र त्या बारा घरच्या मुलींनीं आलोचन जागून काढली. आणि मी—दुसऱ्या दिवशींच्या संकल्पांचीं मखमली पिसें उराशीं कवळीत तशाच अवस्थेंत तळमळत राहिलों.

पहांटे उठून स्नानासाठीं मी घाटावर गेलों तों मुलींच्या घोळक्यांत तूं होतीस. तुझ्या हातांत गौरीचा चौरंग होता. मीं तुझ्याकडे पाहिलें. रात्रीच्या जागरणानें पेंगलेल्या तुझ्या डोळ्यांत मला स्वप्नांची परिपूर्तता दिसली. किती तरी वेळ विमनस्कपणें मी नदीच्या पात्राकडे पहात होतों. तूं जागविलेल्या गौरीवरील कांहीं फुलें तीरावरील लहरींशीं कानगोष्टी करीत होतीं. स्नान न करतांच मी घरीं परतलों आणि रात्रीं वाचीत असलेली ती कादंबरी

एका जुन्या पुस्तकविक्रेत्याला विकून टाकली.

× ×

## २. रुपेरी कडा

तूं बोलूं लागलास कीं सारखा बोलत राहतोस. श्रोत्यांना मोहून टाकण्याची कला, कुणीं रे शिकविली तुला? बांबूला भोकं पाडून तयार केलेल्या बांसरीवर ओठ आणि बोटं ठेवून द्वारकेच्या गोपींना वेड लावतां आलं असतं तर प्रत्येक गोपाळ गोपीनाथ झाला असता. पण कृष्णाच्या लोकप्रियतेची कळ, त्याला जडलेल्या राधेच्या छंदांत आहे.

उत्कर्षासाठीं तुझ्या जिवाला लागलेली तळमळ पाहून कित्येक वर्षं मीहि वेडावून गेलें होतें—तुझ्यावर आसक्त झालें होतें. पण सर्वांना हवासा तूं—तुझी ओढ कुणाकडे आहे हें जाणण्याची माझी उत्कंठा सारखी वाढत होती. आणि एकदां तूं माझ्याकडे आलास—अगदीं अवेळीं आलास. अंतःकरणांत पेटलेल्या होमकुंडाच्या ज्वालांनीं तुझ्या डोळ्यांच्या कडा रक्ताळल्या होत्या. अपूर्व असं कांहींतरी त्यांत होतं. त्या तेजानं मी हतबल झालें आणि तुझ्या हेलावत्या वक्षावर माझी हनुवटी टेकली.

तेव्हांचं तुझं वाक्य: "तूं माझ्या ज्वालेची रुपेरी कडा आहेस"—त्याची आठवण झाली कीं स्वामित्वाच्या अभिमानानं माझ्या कंचुकीचे बंध मुक्तीसाठीं बंड पुकारतात!

× ×

## ३. चांदणी घाट

घाटांतला प्रवास, त्यांत चांदणी रात्र. गाडी चढणीला लागली होती. बैलांच्या गळ्यांतील घुंगुर थकून निःशब्द झाले होते. गाडीवाला जाग्रणानं पेंगत होता.

मी आणि ती....बोलायचं तें बोललों होतों. जिवा-भावाच्या कानगोष्टींनीं आमचीं मनं हळुवारलीं होतीं. त्या हळुवार शीतलतेंत आसक्तीच्या निशिगंधाची धुंदी होती. घाटमाथ्यावर फुललेल्या त्या बिलोरी चांदण्यांत माझं मन जीवनाचं उषा-स्वप्न पहात होतं. नकळत माझा हात तिच्या कटिभंवतालीं गेला. आणि तिचाहि—आम्ही अधिक जवळ येणार तोंच....गाडी उतरणीला लागली. बैलांच्या गळ्यांतील घुंगुरांनीं आपलं मौन सोडलं. खाच-खळग्यांच्या आचक्यांमुळें गाडीवाला जाग्यावर आला; आणि डोळे पुशीतच म्हणाला, 'काय राव, डोळा

लागला व्हता व्हय?'

'नाहीं, चांदण्या रात्रीची घाटांतील मजा पहात होतों.' मी तिच्या कमरेभोंवतींचा हात मागें घेत म्हणालों.

× ×

## ४. असमानी स्वप्न

'मी उद्यां येणार' म्हणतेस. ये! नको येऊं असं मी कसं म्हणूं? परंतु तुझ्या दर्शनानं मी हुरळणार नाहीं. माझा हर्ष तुझ्या दर्शनांत नाहीं. तुझ्या चिंतनानं होणाऱ्या क्लेशांत आहे. तूं जवळ असलीस कीं मी अबोल होतों. दूर गेलीस कीं माझं हृदय घुमूं लागतं. ओठ स्फुरूं लागतात. आणि शब्द नादमग्न होऊन छंदाच्या तालावर नाचूं लागतात. देह-बंधनाच्या त्या मुक्तीच्या धडपडींत मला ऐहिक वैभवाचा विसर पडतो. तुला त्याची जाणीव नाहीं. नसेना का! स्वाति नक्षत्रांतील सरीला कुठें माहीत असतं, कीं पृथ्वीतलावर उधळलेल्या असंख्य जल-बिंदूंपैकीं उद्यां कांहींचे मोती होणार आहेत म्हणून? वर्षाव—भरल्या हृदयानें आणि मुक्त करानें वर्षाव हीच तिची प्रवृत्ति. पण सागराच्या

तळाशीं 'आ' करून बसलेला शिंपला...त्या बिंदूचें मोती करतो. माझं जीवन असंच आहे. माझ्या दुःखाच्या आंचीनं तुझ्या डोळ्यांत आसवांच्या मेघमाला उभ्या राहिल्या. आणि त्यांच्या अभिषेकानं माझ्या मनांत अमर कल्पनांचे मोती निर्माण झाले.

माझं जीवन!—जीवन कसलं तें? मीच नावाडी अन् मीच प्रवासी. एकाकी जीवनांत ना कुणाचा स्नेह, ना कशाचा मोह. दिवसभर नौका वल्हवायची आणि रात्रीच्या वेळीं सुकाणूशीं बसून कष्टानें ओले केलेले चार घास खायचे. तुझं मन कधींकाळीं एखाद्या क्षणीं त्या नौकेच्या डोलकाठीवर बसतं, तुझे मोहमयी पंख मन तरल करतात—त्या तरलतेंत मी आशाळभूतपणें वर पाहतों तों तूं दूरवरच्या अंधुक क्षितिजांत शून्याप्रमाणं विरतांना दिसतेस. तरी वेडे! अस्मानी स्वप्नाप्रमाणें केवळ घटकाभर येऊन चिरकाल अदृश्य होण्यापेक्षां येऊंच नकोस.

× ×

त्याचे 'खादीचे' कपडे अनेक ठिकाणीं उसवलेले आणि रफू केलेले असत. परंतु त्याच्या जीवन-वस्त्राला संयमाचा पीळ होता, प्रतिभेचा शुभ्रपणा होता आणि त्यागाची किनार होती.

पुढें राष्ट्रांत आंदोलन झालं. त्याचं क्रांतिप्रिय भावनामय मन हेलावलं; त्यांत सामील झालं. कांहींतरी कारण काढून सरकारनं त्याच्यावर, 'जनतेच्या मनांत सरकारविरुद्ध प्रक्षोभ उत्पन्न केल्याचा' आरोप ठेवून, खटला भरला.

त्या खटल्याचा निकाल ऐकण्यास आलेल्या अलोट श्रोतृवृंदांत एक सामान्य स्त्री होती. शिक्षिका होती ती. तिची आणि त्या विरागी वीराची ओळखहि नव्हती. त्याला सात वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा झालेली ऐकतांच ती गहिंवरली. शालेय अभ्यासक्रमांत शिवरामपंतांचें 'अग्नि-नृत्या' सारखें रोमांचकारी लिखाण ती शिकवीत असे. म्हणून प्रत्यक्षांत अशी त्यागी व्यक्ति पाहतांक्षणींच तिला आपला दुबळेपणा जाणवला. तिच्या अंतःकरणांत जोराची खळबळ सुरू झाली. आपणहि त्याग करावा असं तिला वाटूं लागलं. ती त्याला भेटली. त्यानं तिला

त्यागाचं मोल पटवून दिलं. तिनंहि आपला जीवितार्थ राष्ट्रासाठीं वेंचावयास आरंभ केला.

आज राष्ट्र स्वतंत्र आहे. सारी जनता मुक्त झाली आहे. तो त्यागी पुरुषार्थांत पूर्वीसारखाच रमला आहे. आणि ती स्त्री—आपला सर्वार्थ पूर्वींप्रमाणेंच परोपकारार्थ वेंचीत आहे. पण तिच्या मनांतील त्याच्याविषयींची ती ओढ—तें अग्नि-नृत्य?

× ×

## ६. या ना सवडीनं!

सभासम्मेलनांतून बोलतांना तूं मला कितीदां तरी ऐकलं आहेस. पण बैठकींत जेव्हां मी बोलतों, विशेषतः मानसशास्त्रांतील प्रमेयांची फोड करण्यांत, सिद्धान्त उप-सिद्धान्तांच्या सूत्रांची गुंफण घालण्यांत जेव्हां मी तन्मय होतों तेव्हांचे तुझ्या चेहऱ्यावरील भाव माझ्या शब्दांना गति देतात.

असंच एक दिवस आपण काव्यशास्त्रावर बोलत होतों. 'तारुण्यांत स्फुरलेल्या भाव-गीतांचा उगम स्त्रीच्या हृदयांत आहे, अस्तित्व तिच्या कंठांत आहे आणि लय ओठांत आहे' ह्या माझ्या विधानानें तूं स्वतःला

सांवरलंस, तेव्हां माझ्या लक्षांत आलं, कीं श्रोत्यांत तूं स्त्री अशी एकटीच होतीस.

तुमच्याकडून परतायला मला बरीच संध्याकाळ झाली होती. आपण सर्वजण अंगणांत उभे होतों. सर्वांनीं मला निरोप दिला आणि माझाहि घेतला. परंतु आपण दोघंहि बुचकळ्यांत पडलों. मी तुझ्याकडं पाहिलं. अंतरींच्या कोनांत दडून राहिलेल्या कसल्या तरी गूढ संवेदनांचा तूं शोध करीत असावीस. जाण्यापूर्वी क्षणभर—अगदी क्षणभरच—तुझी नजर माझ्यावर खिळली. ती सांगत होती: 'या ना सवडीनं!'

× ×

## ७. थडगं

प्राथमिक शाळेंतील इतिहासांत त्यानं ताजमहालचं वर्णन वाचलं होतं. अनेक ठिकाणीं त्याचीं चित्रंहि पाहिलीं होतीं. परंतु बालपणीं त्याचं विशेषसं आकर्षण त्याला वाटलें नाहीं. मुसलमानांच्या इतर गोलघुमटी मशिदींइतकाच तो दर्शनीय वाटला.

यौवनाचा सोपानमार्ग चढतांना मात्र त्याला शहाच्या मुमताजवरील प्रेमाची ही चिरंतन स्मृति जवळून पहा-

वीशी वाटूं लागली. विद्यालयीन परीक्षेसाठीं नेमलेल्या कथा-कादंबरींतील नायिकांच्या ठिकाणीं तो मुमताजला कल्पून स्वतःला शहाजहान समजे. एका अनामिकच्या चिंतनांत तो रमे. कालान्तरानं तो पदवीधर झाला. त्याची कल्पकता कर्तव्याच्या दाहकतेनं करपूं लागली. वाढत्या संसाराच्या संकटांनीं तो त्रस्त झाला. एके काळीं पौर्णिमेच्या रात्रीं अमृत–किरणांत न्हाणारा ताजमहाल पहाण्याची तीव्र इच्छा तो आल्यागेल्याजवळ बोलून दाखवी. आतां तो ताजमहालचं नांवहि काढीत नाहीं. आपल्या स्वतःच्या मुलाला शिकवायला बसला तर तो आवडीनं रामायणांतील कथा सांगतो. कॉलेजांत संस्कृतचा गाढा पंडित म्हणून ओळखला गेल्यामुळं त्याच्याकडं कुणीतरी ओळखीचे विद्यार्थी शिकवणीसाठीं येतात. त्यांना तो शिकवतो, पण कालिदासाच्या शृंगार-विलासा-पेक्षां भवभूतीच्या करुण-विलासांतच तो अधिक रंगतो. एकदां तो एका विद्यार्थ्याकडे शिकवायला गेला. त्या दिवशीं त्या विद्यार्थ्याची बहीणहि शिकायला बसली होती. तीच त्याची कॉलेजमधील अनामिका. तिघांचं उत्तर-रामचरिताचं वाचन चाललं होतं. समोरच कांचेच्या कपाटांत ताजमहालची एक उंची प्रतिकृति होती. त्याच्या स्मृतीला जाग आली. अनिमिष नेत्रांनीं तो त्याकडे

पहात राहिला.

'काय पहातां एवढें त्यांत? घरोघरीं असतात हल्लीं.' त्याची अनामिका बोलली.

'एका लावण्यवतीच्या प्रेमासाठीं वेंचिलेलं जीवन-सर्वस्व! सत्ताधीशाच्या संपत्तीचा प्रीति-संगम!' त्यानें उत्तर दिलं; पण तिच्या तरलतेला त्यांतील पांडित्याचा बोध झाला नाहीं.

'जा ना घेऊन तुम्ही तो! इतका आवडला तर काय झालं न्यायला!' पांडित्याची दिलदारपणानं किंमत केली.

'आज नको. नेईन कधीं तरी.' त्यानं उडवाउडवीचं उत्तर दिलं.

त्यानंतर आठवडाभर उत्तररामचरिताचं वाचन झालंच नाहीं. एके दिवशीं ती अनामिका ताजमहाल घेऊन त्याच्याकडे आली.

'हें काय?' चिंताज्वरामुळें क्षीण झालेल्या आवाजांत तो म्हणाला.

'ही आमची स्मृति!' तिच्या कृतज्ञतेनं उत्तर दिलं.

'आणि माझं थडगं!' हें तो बोलणार, इतक्यांत त्याच्या चिरंजिवानं फाडलेलीं उत्तररामचरिताचीं पानं

पत्नीनं त्याच्याजवळ आणून दिलीं.

'बिचारा भवभूति' एवढें बोलून त्यानें एकदां पत्नी-कडे आणि एकदां त्या अनामिकेकडे दृष्टि टाकली!

× ×

## ८. निशा

तो येणार या अपेक्षेनं ती वाट पहात होती. पण अपेक्षितांची उत्कंठा वाढविण्याचं कार्य काळ, योग्याच्या निर्विकारतेनं करीत असतो. रात्रीचीं घटका-पात्रं ब्रह्मांडाच्या अवकाशांत फिरत होतीं—काळाच्या जीवनांत विरत होतीं. पूर्वेच्या हनुवटीचं चुंबन घेऊन चंद्र उत्कर्षाच्या अस्मानी चढणी चढूं लागला, तसं तिचं मन अविचल होऊं लागलं. हात जोडून ती आपल्या निशिनाथाच्या प्रतिमा-पूजनांत रमली....स्वतःला विसरली.

रात्रीच्या अविरत चिंतनांत पतीच्या मनोभावनांत सतीचं अस्तित्व विलीन झालं. तृप्तीच्या आभासांत तिचा डोळा लागला. उत्तररात्रींच्या अखेरच्या घटकेला तिच्या ध्यासमग्न मनाला निळ्या अस्मानी प्रदेशांतून वाहणाऱ्या आकाश-गंगेंत उमललेलीं अनेक सुवर्ण-कमलें दिसलीं. त्याच निशेंत ती दचकून जागी झाली तों साफ उजाड-

लेलं. ती गच्चीच्या कठड्यावर हात ठेवून उभी राहिली. तिची नजर समोरच्या कुरणावर खिळली. गवताच्या पात्यांवरील कोवळ्या किरणांत न्हाणारे सप्तरंगी दंव-बिंदु हेमंताच्या प्रभात-गीतांतील अखेरचं कडवं गात होते. त्यांत तिला पुढील भावार्थ दिसला: 'मानवी स्वप्नांची पूर्तता नेहमीं अशीच होत असते. नाहींतर त्याच्या प्रतीक्षेच्या निशेंत मीं पाहिलेलीं आकाश-गंगेंतील सुवर्णकमळं प्रत्यक्षांत मला अश्रूंत पहावयास मिळालीं नसतीं.'

दिवसाच्या कामाला लागण्यापूर्वीं ती हें म्हणाली, 'स्वातींतील मोती घेऊन येणारी निशा जातांना उषेच्या हातांत फक्त शिंपलेच देऊन जाते.'

× ×

## ९. तपोधन

तुला पाहिल्यापासून कितीतरी दिवस मला तुझं नांवहि माहीत नव्हतं. आणि मीं तें कुणाला विचारलं देखील नाहीं. जरूर काय? तुझ्या अभिनयांतून ओसंडणाऱ्या लालित्यांत डोळे रंगून जात. मन कसल्या तरी जाणिवेंत तरंगत राही.

तारुण्याच्या उन्मेषांत, जीवनाच्या लहरीवर माझ्या

मनांत प्रत्यहीं नवीं स्वप्नें उमलत. अरुण-उषेच्या मीलन-रागानें रंगलेलीं, सुवर्ण-किरणांत न्हालेलीं अशीं कितीतरी सुवर्ण-पुष्पं उराशीं घेऊन मी प्रवासाला निघें. कित्येकदां वाटे, 'मीं फुलविलेलीं हीं उत्फुल्ल पुष्पें तुला दाखवितां आलीं तर—! त्यांतील कांहीं तुला देतां आलीं तर—!' कित्येक वर्षं असं वाटत राहिलं आणि मनींचीं स्वप्नें फुलत राहिलीं.

आणि आज—? जीवनांतील तपानं आपण परस्परां-कडून भाव-बलानं जिंकलों गेलों आहोंत. तपापूर्वींची तूं होतीस तीच आहेस; परंतु मी—? माझ्या अंतरींच्या ज्वालेवर होरपळलेल्या स्वप्नांचं निर्माल्य तुला कसं वाहूं? तूं आपल्या ललित-करांच्या सौजन्यानं जुळलेल्या अंज-लीनें त्याचा स्वीकार करावास इतकं माझं हें तपोधन मोलाचं आहे काय?

× ×

## १०. तृप्ति

अनेकांप्रमाणं त्याचाहि मनोभंग झाला होता. पण त्यानं तितकंसं मनाला लावून घेतलं नाहीं. आपल्या इच्छाशक्तीचा व्यय त्यानें ललित—वाङ्मयाच्या अध्ययना-

साठीं केला. एकदां त्याच्या वाचनांत कल्पना-प्रिय स्वप्नाळू लेखकाचं लिखाण आलं. त्याच्या भाव-विवश मनाचा त्या लेखकानं ताबा घेतला.

कांहीं वर्षांनीं तो स्वतः लिहूं लागला. अत्यंत ललित-रम्य लिहूं लागला. शेंकडोंवारी त्याच्या पुस्त-काच्या प्रती खपत. त्याच्या उध्वस्त स्वप्नांच्या तंद्रींत तो लिहीत गेला आणि रसिकांना, त्यांच्या प्रीतीच्या इंद्र-धनुष्याचे रंग त्यांत दिसत गेल्यामुळें, ते बेहोषपणें वाचीत होते.

एके दिवशीं एकान्तवासांत तो आपल्या नव्या कादं-बरीच्या कथानकाचा ('पुनर्मीलन' तिचं नांव) आराखडा तयार करीत असतां दार वाजलं.

'कोण आहे ?' तंद्रींतच तो ओरडला.

'मी आलें आहे.' बाहेरची व्यक्ति उद्गारली. जरा त्रासिकतेनंच त्यानं दार उघडलं. पाहतो तों ती—त्याची एके काळची प्रेयसी !

'कशाला आलीस ?' तो कपाळाला आठ्या घालीत म्हणाला.

'तुझ्याकडे राहायला.' तिनं आपल्या हातांतील त्याचीच अत्यंत लोकप्रिय झालेली 'तुझ्यासाठीं' ही

कादंबरी त्याच्यासमोर फेकीत उत्तर दिलं. क्षणभर तो स्तिमित झाला आणि लगेच कसलासा विचार करून त्यानं आपल्या मेजावरील नव्या कादंबरीचीं टांचणं टरकावून खिडकीवाटे भिरकावून दिलीं !

'हें काय ?' त्याच्या मनोवृत्तीचं आकलन न झाल्यामुळं तिनं आश्चर्य व्यक्त केलं.

'पुनर्मीलनाच्या मार्गांतील अडचण होती ती दूर केली. तुझ्या विरहाचा विसर पडायचं तें एक साधन होतं. आतां काय करायचं तें ?' त्यानं समजावून दिलं.

'नको ! पूर्वींसारखेच लिहीत रहा तुम्ही.' तिनं विनंति केली.

'बरं लिहीन. आतां तर एक नावीन्यपूर्ण कादंबरीचा आराखडा आहे माझ्यासमोर.' त्यानं तिला श्लेषालंकाराचा आहेर दिला.

'कुठं आहे ?' लक्षांत न आल्यामुळें ती म्हणाली.

'हा बघ संपूर्ण आराखडा ! या माझ्या नव्या कादंबरीचं नांव 'तृप्ति.' पण ती मी एकटाच वाचणार आहें.' त्यानें तिला जवळ घेत म्हटलं.

त्यानंतर त्यानें लिहिण्याचा खूप प्रयत्न केला, पण अजूनपर्यंत तें छापून आलं नाहीं !

x x

# संयम

चारचौघांत तीं दोघेंहि आनंदी दिसत. हंसत-खेळत असत. सर्वांना वाटे, तीं संकोचून बोलत नसावींत. एक-मेकांच्या पश्चात् मात्र तीं परस्परांची स्तुति करीत. पण एकत्र बोलतांना तीं कधीं कुणाला दिसलीं नाहींत.

तिचा विसर पडावा म्हणून तो कांहीं उद्योगांत रमे. त्याचा विसर पडावा म्हणून ती भरपूर वाची. सायंकाळीं श्रमपरिहारासाठीं तो आरामखुर्चीत बसला कीं त्याच्या अंतश्चक्षूंसमोर ती अनुराधा नाचूं लागे. हा सारा भास आहे, ह्या जाणिवेच्या दुःखानें तो डोळे मिटून घेई. दुपारच्या वामकुक्षीपूर्वीं वाचलेल्या अपुऱ्या कथा ती त्याच्या चिंतनांत पुऱ्या करी.

एकदां ती आजारी असल्याचं त्यानं ऐकलं. त्याच मित्र येत. त्याच्याजवळ तिच्या 'स्थिति'चं वर्णन करीत. निर्विकारपणें तो ती ऐके. त्यांना त्याचें आश्चर्य वाटे. एकदां कोणीतरी म्हणालंसुद्धां, 'आंतडं असेल तर पीळ पडेल ना?'

आणि अखेर निर्माल्याप्रमाणें कोरड्या पडत चाल-लेल्या तिच्या ओठांतून अंतरींचे बोल बाहेर आले, 'राजन्! अखेरपर्यंत तूं कां रे आला नाहींस? माझ्या

मनाची पाकळीन् पाकळी तुझ्या दर्शनानं उमलली असती. पण तूं बांबूच्या दांडीला भोकं पाडणाऱ्या भ्रमरासारखा रुक्ष कार्यांत मग्न आहेस. ये! अखेरच्या घटकेला तरी ये!'

त्याच्या मित्रांना तिच्या वागण्याचं आश्चर्य वाटलं आणि भाग्याचा हेवा वाटला. नाइलाजानं त्यांनीं तिची अखेरची इच्छा त्याला सांगितली. धीर करून तो तिला भेटायला गेला. पण त्यापूर्वीच तिनं जगाचा निरोप घेतला होता. तिच्या उशाशीं बसून त्यानं आपल्या आवरलेल्या अश्रूंच्या अभिषेकानें तिला स्नान घातलं. जमलेल्यांपैकीं कुणीतरी म्हणालं, 'ही माया? अजूनपर्यंत बोलला देखील नाहीं!'

निर्विकारपणें त्यानं आपल्या अश्रूंनीं भिजलेली तेथील धूळ मस्तकाशीं नेली आणि तो परत फिरला. सारेजण हलक्या आवाजांत पण एकदम प्रस्फुरले, 'केवढा हा संयम!'

x x

## १२. विकार

हेमंतऋतूंतील थंडीचे दिवस. मनसोक्तपणें आम्हीं त्या तळ्यांत डुंबत होतों. पण आमच्या हुंदडण्यामुळं त्याचं पाणी गढूळलं नव्हतं. पोहून थकल्यामुळं सारे-जण कांठावर उन्ह खात लवंडले होते. मीहि तळ्याच्या कोपऱ्यांतील पाण्यांतच एका शिलेवर उभा होतों. इतक्यांत माझी दृष्टि त्या कोपऱ्यांत असलेल्या कमल-पुष्पांकडे गेली. कांहीं पूर्णपणें विकसलीं होतीं. कांहीं अर्धोन्मीलित होतीं. त्यांच्या दलांवर चार-दोन काळ्या मुंग्या फिरत होत्या. माझ्या मनांत विचार आला, 'काय बरं शोधीत असाव्यात ह्या? मखमली दलांच्या चढणी–उतरणीवरून विहरण्यांत यांना कोणतं सुख मिळत असावं? कांहीं वेळानं त्या दिसेनाशा झाल्या. बहुतेक त्यांना मधुकोशाची वाट सांपडली असावी. कितीतरी वेळ त्या फुलांवर माझी दृष्टि खिळून राहिली. त्या समा-धींतून जाग येतांच मी आजूबाजूला पाहिलं. कुणाचं माझ्याकडं लक्ष नाहींसं पाहून पूर्वीच्या जोमानंच मीं एक सूर मारला आणि वर आलों; तळ्याच्या अथांग निर्मल जीवनांत क्षण-जीवि विकार विरघळला होता!

× ×

## अभिलाषा

कितीतरी दिवस तुझी-माझी भेट नाहीं. तूं गेलास तेव्हां मन हलकं होईतोंवर मी रडलें. तेव्हांपासून या ना त्या कारणावरून तुझी आठवण येते. कधींकधीं राहवत नाहीं. मग पाणी आणण्याचं निमित्त करून, घेतें घागर नि जातें नदीवर.

अशाच एका सायंकाळीं, दिवसभराच्या तुझ्या आठवणीनं मन जडावलं होतं, म्हणून नदीवर गेलें. नदीच्या बिलोरी अंतरंगांत तीरावरील तरु-लतांचीं हिरवीं प्रतिबिंबं पडलीं होतीं. मन त्या लहरींवर हेलावत होतं. संध्येच्या छायेंत नदीचं पाणी काजळूं लागलं तरी मला भान नव्हतं. शेजारची निमा हळूच येऊन माझ्यामागें उभी राहिली तेव्हां तिच्या चाहुलीनं मी दचकलें.

'वेडे, काय पहातेस त्या पाण्यांत?' तिनें विचारलें.

'अभिलाषा' मी मनांतलें बोलून गेलें.

'कुठें आहे ती?' तिनं प्रश्न केला.

'ती बघ! त्या जलाशयांतील हिरव्या प्रतिबिंबांत.' हें बोलतच मीं घागर भरून घेतली नि तिच्याबरोबर घरीं परतलें.

× ×

## १४. पैंजण

त्या दिवशीं तिनं मला आग्रहानं घरीं नेलं. मींहि विशेष आढेवेढे घेतले नाहींत. माझा नि तिचा तसा कांहीं परिचय नव्हता. पण जेव्हां जेव्हां आमची भेट होई, संभाषण होई, तेव्हां तेव्हां तिच्यांतील बारीक-सारीक आवडी-निवडी मीं हेरल्या होत्या. प्रसंगीं त्यांचें रस-ग्रहण केलं होतं. हेंच कारण त्या दिवशीं तिनं मला घरीं बोलवावयास घडलं असावं.

'हें पाहिलेंस पैंजण?' ती तें माझ्या हातांत देत म्हणाली. मीं तें घेतलें आणि उगाच पहात राहिलों. नंतर तिनं ती नृत्य शिकायला कुणाच्या प्रोत्साहनानं गेली, तिचं कौतुक कुणीं कुणीं केलं, वगैरे गोष्टी बारकाईनं आणि आपल्या लाडिक अंगविक्षेपानं सांगायला सुरुवात केली. तेवढ्यांत माझी नजर समोरच्या 'कांचन–मृग' ह्या तैलचित्रावर खिळली.

'काय आहे पहाण्यासारखं एवढं त्या चित्रांत?' माझं लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न करीत ती म्हणाली.

'ह्या पैंजणांतील भावार्थ—' मी निश्वास टाकून बोललों आणि पुढं सुरुवात केली, 'लक्ष्मणाच्या सीतेवरील उदात्त भक्तीचा आविष्कार ह्या पैंजणाच्या मूक संगीतांत

आहे. पण हें मला दाखविण्यांत तुझा गैरसमज होत आहे. क्षमा कर! तेवढी कुठली माझी थोरवी?' ह्यांतील खोंच तिच्या लक्षांत आली. विशेष न बोलतां मी परत फिरलों.

—त्यानंतर अनेक वेळां मीं पाहिलं, पण पूर्वीचा एकहि कलावंत तिच्याबरोबर नव्हता. स्वच्छंदांत नाचणाऱ्या कलेचा कैफ तिच्या दृष्टींत थैमान घालीत नव्हता. भांगांत सौभाग्य-सूचक सेंदूर नव्हता आणि पायांत उन्मत्तांना धुंद करणारे पैंजण नव्हते.

'विसरलांत मला?' मायेच्या प्रश्नचिन्हानें तिनं एकदां मला विचारलं.

'अजूनपर्यंत विसरलों होतों, पण आतां नाहीं विसरणार'

'कारण?' तिची कुतूहलता जागी झाली.

'कारण आज तुझ्या पायांत पैंजण नाहींत. ते तुझे नव्हतेच; जगाचे होते. जोंपर्यंत त्यांच्या तालावर तूं नाचलीस, तोंपर्यंत ते त्यांनीं तुझ्याजवळ ठेविले आणि आतां ते नेले.'

माझ्या ह्या कटु-सत्याच्या श्रवणानं तिचं मन बधिरलं—तिच्या ओठांना कोरड पडली—तिला बोलणं अशक्य झालं!

× ×

## १५. करवंदं

माथेरानचा घाटमाथा चढून गेलों तेव्हां आम्ही सारेच थकलों होतों, परंतु उत्साहाच्या आणि उत्सुकतेच्या भरांत आमच्यापैकीं बहुतेकजण लगेच पॉइंटस् (कडे) पाहण्यासाठीं निघाले. तीस-पस्तीस पॉइंटस् दोन दिवसांत सावकाशीनें पाहून होणार नाहींत, हेंहि त्याचं एक कारण होतें. माझं सौंदर्यजीवि मन मात्र त्या भर उन्हाचं बाहेर पडावयास राजी नव्हतं, म्हणून मी पर्णकुटींत तसाच पडून होतों.

—इतक्यांत एक गिरिकन्या माझ्यासमोर येऊन उभी राहिली. प्रथम मी बुचकळ्यांत पडलों. पण डोक्यावरील टोपली खालीं ठेवून काळ्या टपोऱ्या करवंदांचे द्रोण जेव्हां तिनं माझ्यासमोर ठेविले, तेव्हां माझ्या मनांत येऊन गेलं, 'ज्या कड्यावरून आम्हीं खालीं बघावयास घाबरतों तेच कडे कष्टानं चढून येणारी ही गिरिजा— हिच्या श्रमाचं मोल....?'

मागचा पुढचा विचार न करतां ते सारे द्रोण मीं विकत घेतले. रुपयाच्या मोलांत आपल्या श्रमाची किंमत झाल्यामुळं, ती तें नाणें शेजारच्या पायरीवर वाजवून घेतांना हंसली....त्या स्मितांत तांबड्या धुळीचीं पुटं

बसलेल्या तिच्या तांबुस पायांतील थकवा नाहींसा झालेला दिसला. मळकट लक्तरांत कशाबशा झांकलेल्या तिच्या उपांगावरील उदराची दुसऱ्या दिवसाची चिंता दूर झाल्याचें दिसलें....परंतु त्यावर असलेल्या उरोजाकडे माझी नजर जातांच ओशाळून तिनं माझ्याकडे पाहिलं. त्या उभार बुरुजावरून माझ्या दृष्टीचा जो कडेलोट झाला तो ती एकदम तिच्या पायाशीं येऊन स्थिरावली. मीं कसंबसं तिच्याकडं पहात विचारलं,

'उद्यां पण आणशील ना?'

'हं.' म्हणून ती निघून गेली, तेव्हां मला बरं वाटलं.

थोड्या वेळानं माझे सोबती परत आले. समोर करवंदांची रास पडलेली पाहून साऱ्यांना आश्चर्य वाटलं.

'कोठून आणलींस रे एवढीं?' एकजण म्हणाला.

'अरे बाबा, पॉइंटस् चढल्याशिवाय नाहीं इतकीं काळीं टपोरीं करवंदं मिळत!' मी रुबाबांत बोललों.

'पण तोलविल गेला म्हणजे? साराच रुबाब तळाशीं!' त्यांनीं भीति व्यक्त केली.

'मग, मी काय घसरलों नसेन? अरे, अगदीं पायथ्याशीं आलों!' मी माझ्या मित्रांना गिरि-कन्येची व माझी मुलाखत सांगितली. तो सबंध दिवस 'कड्यां-

वरील करवंदं' हा माझ्या सोबत्यांचा थट्टेचा विषय झाला होता.

दुसऱ्या दिवशीं ती गिरिजा करवंदं घेऊन येईल या संकोचयुक्त भीतीनं मी भर उन्हाचा पॉइंटस् पहाण्यास निघालों, तेव्हां सारेजण एकदम ओरडून म्हणाले, 'स्वामी, घसराल बरं का त्या कडयांवरून!'

× ×

## १६. सीमान्त-पूजन

लहानपणीं प्रत्येक चीज चिमणीच्या दांतानं विभागून मला दिल्याशिवाय तिला राहवत नसे. पण तिचे ते चिमणीचे निःस्वार्थी दांत आज मांजरीचे झाले आहेत. कुणाच्याहि चाहुलीला बुजणारं तिचं सशाचं मन आज बुलबुलाचं झालं आहे. परकराचे ओचे खोवून माझ्यासमोर निस्संकोचपणें दोरीवरील उडयांचीं शतकें काढणारी ती आज आपल्या पातळाच्या चुण्या चांचपीत मुरडते आहे, पण माझ्यासमोर नव्हे. त्या वेळीं आम्हीं दिवसभर इतकीं जवळ असत असूं कीं वाडींतल्या माणसांनीं आमच्या जाणिवेंतहि नसलेलें नातें जोडून टाकलं होतं! त्या वेळीं आम्हीं परस्परांना लाजत असूं;

पण आज तिच्या दर्शनानं माझं मन खट्टू होतं. तिचं मी कसं सांगू?

परवां ती मला रस्त्यांत भेटली ती खूप दिवसांनीं आणि तीसुद्धां 'सह'. तिच्या दर्शनानं उचंबळलेले माझे अध्याहृत मनोभाव 'सह'च्या अस्तित्वामुळें स्थिरावले. कांहीं बोलावंसंच वाटेना. आम्ही तिघं समभुजत्रिकोणांत उभीं होतों. ती आपल्या संसार–कथा सांगत होती. मी उभा होतों म्हणूनच ऐकत होतों असं म्हणतां येईल. परंतु माझं लक्ष तिच्या पूर्वीच्या स्वरूपांत झालेल्या फरकाकडे होतें. मी तिच्याकडं पहात होतों, तिचे 'ते' मला न्याहळीत होते आणि ती अधूनमधून आमच्याकडे पाहून बोलत होती. सांगणं संपलं, तेव्हां ती माझ्याकडे वळून म्हणाली, 'आतां तुमची ओळख करून देतें हं! हे श्री. अंतर्धाने. प्रिमरोझ् कॉलेजमध्यें प्राध्यापक आहेत मानसशास्त्राचे. आतां मोठे झाले असले तरी लहानपणीं आम्ही एकत्र खेळलों आहोंत.' तिच्या यजमानांची ती ओळख करून देणार तोंच ते म्हणाले, 'हे ह्यांचे 'हे'. रेडियोचे एक सामान्य कारखानदार.'

एवढंच बोलून त्यांनीं माझा निरोप घेतला. माझ्याशीं विशेष बोलावंसं त्यांना वाटलं नाहीं. जातांना तिनं दोन-तीनदां माझ्याकडं वळून पाहिलं. तिच्या त्या

दृष्टीच्या पोकळींत माझ्या असूयाप्रेरित मनाचं तांडव चालू होतें. त्या तांडव-नृत्याचं नांव 'सीमान्त-पूजन.'

× ×

## १७. मधुप

माझ्या घरासमोर एक सरोवर आहे. संध्येच्या मंदिरांत प्रवेश करणाऱ्या रवीची भक्तिभावानं ओथंबलेली नजर त्यावर खिळली कीं तें बिलोरी आदर्शासारखं चमकतं. घटका-घटका मी त्याकडं पहात बसतों. मधून-मधून येणाऱ्या झुळुकेनं हिंदळलेल्या जल-लहरींवर कमल-दलं डुलूं लागलीं कीं, त्यांतून एखादा समाधिस्थ मधुप बेचैन होऊन बाहेर येतो—भिरभिरूं लागतो.

साऱ्या दिवसाच्या श्रमानं त्रस्त झालेल्या मनाला ध्यानस्थ करण्याचं सामर्थ्य निसर्गाच्या त्या भाव-चित्रांत मला दिसतं. पण मध्येंच तुझ्या सान्निध्याच्या संधि-कालीं फुललेल्या स्मृति-पुष्पांच्या भावकळ्या विकार-लहरींवर तरंगूं लागल्या कीं माझा मनो-मधुप बेचैन होतो—भिरभिरूं लागतो!

× ×

## १८. विरस

त्यावेळीं ती बारा-तेरा वर्षांची असेल. अजाणतेच्या अंगणांत हुंदडतांना बदामी कपाळावरील घामानं ओल्या झालेल्या बटांना मागें सारणाऱ्या तिच्या लालसर बोटांत लालित्य यावयाचं होतं. वाऱ्याच्या झुळुकेवर आणि श्वासोच्छ्वासावर हलणाऱ्या पोलक्यांतून तिच्या उरोजांचं अस्तित्व त्यावेळीं जाणवत नव्हतं. परकराचे ओचे खोवून भिरभिरत्या पांखरांप्रमाणं आपल्या मैत्रिणींच्या मेळाव्यांत उठून दिसणारी ती त्यावेळीं मला अस्मानी परीच वाटे. --आणि आज किशोरावस्थेंतील तिच्या खेळकर गात्रांत कामिनीचा विलास उतरला आहे. कपाळावरील ठसठशीत सौभाग्य-तिलकाला गौणत्व येऊं नये म्हणून कुरळ्या बटा स्थान-बद्ध झाल्या आहेत. तंग कंचुकीवर रुळणाऱ्या एक-दाणीचे मणि अधूनमधून जेव्हां ती चाळवते, तेव्हांच्या तिच्या दर्शनानं कालिदासाच्या 'विक्रमोर्वशीया'ची माझी उजळणी होते. पण एकान्त साधून घेतलेल्या तिच्या दर्शन-सुखांत मनाचा विरस होतो.

x x

## १९. मुक्ति

झुळझुळणाऱ्या झऱ्यासारखा माझ्या अवखळ जीव-नाचा ओघ प्रत्यहीं शरदृऋतूंतील मंदाकिनीच्या प्रवाहा-प्रमाणं धीरगंभीर आणि प्रशान्त होत आहे. वनराईच्या वेड्या-वांकड्या वळणावर माझ्या स्पर्श-सुखासाठीं थरार-णारे तरू—त्यांना सोडून आज मी कितीतरी दूर आलें आहें. 'आपल्यांतील व्यक्तित्वाच्या विशेषानं आसमन्त फुलत आहे,' ह्या जाणिवेंत जो अनुपमेय आनंद आहे, जी धुंदी आहे, त्यांतच मी दिवसभर असतें. तरीहि कधींकधीं चित्त लहरून सोडणारे क्षण येतातच. सायं-काळच्या वेळीं घरट्याकडं परतणाऱ्या पक्ष्याच्या चोंचींतून पडलेल्या काडीनं जलाशयांत वलयं निर्माण व्हावींत ना, तशा मानस-लहरी ओंठापर्यंत येतात आणि विरतात.... पण....

आतां मला खेद होतो आहे तो एकाच गोष्टीचा कीं, माझ्यासाठीं तूं आपल्याला स्थान-बद्ध केलं आहेस. सर्वस्वाचा होम करून तूं माझ्या सहवासांत एका पर्ण-कुटींत येऊन राहिला आहेस. तुझ्या आश्रमांत कल्पलता आहेत. त्यांचीं फुलं तूं माझ्या पूजेसाठीं आणतोस याचा मला हर्ष का होत नाहीं? पण नको! दिल्वरा, माझ्या

मर्यादा मी जाणतें. तुझ्या भक्तीनं माझा अहंकार जागा होणार नाहीं. तुझीं हीं फुलं क्षितिजावरील संध्यारंगावर उधळून टाक! जागृति आणि स्वप्न, कर्तव्य आणि प्रेम यांना एकत्र आणणाऱ्या त्या सुवर्णघटकेला अनंताचं अस्तित्व तेथें असतं. तर जा! क्षितिजाच्या उंचीवरून तूं उधळलेल्या फुलांतील कांहीं पाकळ्या जरी मला मिळाल्या तरी मी स्वतःला धन्य समजेन. पण माझ्यावरील निष्फळ वेड्या मायेनं व्यक्तित्व नष्ट होत चाललेल्या तुझ्या अस्थिपंजर देहाकडं मला पाहवत नाहीं. तरी माझ्या मानस-हंसा, मला विसर! यांतच दोघांची मुक्ति आहे.

× ×

## २०. शब्दांची शक्ति

माझ्या प्रतिभेची कक्षा मीं कधींच ओळखिली होती. पण तूं होऊन मला वेगळेपणानं वागवूं लागलीस, तेव्हां आकांक्षांना दृष्टि देणारं मन म्हणालं, 'पहा, तुझ्यांत कांहींतरी आहे' त्या कांहींतरीचा बोध मला कित्येक वर्षं झाला नाहीं. एके दिवशीं माझं तें मनोवैभव घेऊन मी तुझ्यापासून दूर दू—र गेलों. जातांना तूं फक्त एव-

इंच म्हणालीस, 'थोर होऊन ये!' मी तुझ्या डोळ्यांकडं पाहिलं, त्यांतील भाव त्या शब्दांत उतरले होते.

अज्ञातवासांत माझीं अनेक वर्षं गेलीं, परंतु तुझ्या शब्दांनीं दिलेला मनाचा पीळ गेला नव्हता. आपत्तींनीं देहाची रक्षा केली तरी तुझ्या सहानुभूतीनं संवेदित झालेलं मन त्यांच्याशीं झगडत होतं. अखेरीस माझा वनवास सरला. तपापूर्वीं दुर्लंघ्य वाटणाऱ्या आकांक्षांचीं शिखरं मी उल्लंघून गेलों होतों. निष्क्रियावस्थेच्या वयांत दुबळा म्हणून कींव करणारे माझे मित्र आतां कौतुक करण्याची आलेली संधि दवडीत नाहींत. पण तूं कुठें आहेस? 'थोर होऊन ये!' या तुझ्या षडक्षरी संदेशानं चैतन्यमय झालेलं जीवन तुझ्या पायाशीं ओतण्याची संधि येईल तेव्हां तूं दिङ्मूढ होऊन विचारशील, 'हें काय?'

'शिवांगीच्या शब्दांची शक्ति!' तपस्व्याच्या विनयानं मी उत्तर देईन.

× ×

## २१. लालित्य

माझ्या जीवनांत तूं अगदीं एकजीव झाली आहेस.

आकाशापासून त्याचा नीलिमा वेगळा करतां येईल का?

पृथ्वीवर मोत्यांची बरसात करणाऱ्या घनश्यामाची सहचरी सौदामिनी त्याच्याबरोबरच सती जाते! आणि मार्तंडाच्या प्रखरतेंत दिवसभर जळून जगासाठीं स्वतःची रक्षा करणारा सागर....सरितेचं सारं लालित्य त्या तपस्व्याच्या आलिंगनांत विराम पावतं!

—वसंतऋतूंत कुंजांतील शीतलतेत तरु-लतांत लपून बसणाऱ्या वायुलहरींचा जो सुखद स्पर्श,

—मंगल कार्यांत झडणाऱ्या चौघड्याच्या निनादांत सनईचे जे मंजुळ नाद,

—अनंताच्या पूजेसाठीं आणलेल्या गंधपुष्पादिकांच्या साहित्यांत सौगंधाचं जें अस्तित्व,

तेंच तुझें माझ्या जीवनांत आहे.

तेव्हां स्पर्श-रूप-रस-नाद-गंधादिकांच्या अनंत तत्त्वांतून तुझें प्रकृति-लालित्य माझ्या पुरुषार्थांत स्वतःला विसरलं आहे.

× ×

## २२. अपेक्षा

तिची आणि माझी क्वचितच भेट होई. पण जेव्हां होई तेव्हां तिच्या नजरेंत मला, कां कोण जाणे, विलक्षण

आपलेपणा असल्याचें दिसून येई; आणि त्या आपले-पणांत कसली तरी अपेक्षा आहे असं वाटे. अशाच मनाच्या दूरावस्थेंत कितीतरी वर्षं गेलीं. घटकाघटका तिचं चिंतन करूनसुद्धां तिच्या मनो-वृत्तीचं आकलन मळा झालं नाहीं.

एके दिवशीं सायंकाळीं ती माझ्याकडं आली. आपल्या गुलाबी रंगाला साजेसं अस्मानी वस्त्र तिनं परिधान केलं होतं. तिच्या हातांत काचेचे दोन पेले होते. त्या पेल्यांतील पेयांत संध्यारंग विरघळलेले मला दिसले. तिच्या कटाक्षांत काव्य आणि ओठाआड तत्त्व-ज्ञान लपलं होतं. तिच्या अनपेक्षित येण्यानं भाव-मूढ झाल्यामुळं मी विचारायचं म्हणूनच तिला विचारलं.—

'हें काय? माझी अपेक्षा सुद्धां नव्हती तूं येशील अशी!'

'राहवेना म्हणून आलें. इतकीं वर्षं मनांत बाळगिलेली अपेक्षा बोलून दाखविण्याची इच्छा झाली म्हणून आले,' ती उत्तरली.

आणि त्या दोन पेल्यांतील एक माझ्या हातांत देत ती म्हणाली,

'हा तूं घे! यांतील थेंब नि थेंब तूं प्राशन कर!'

तिच्यावरील अनन्य प्रीतीनं मी तो जांभुळी रंगाचा पेला हातीं घेतला, आणि पहिल्याच घोटांत माझा गळा करपून गेला. डोळे निळे झाले. तरी ती निर्विकार होती. नंतर दुसरा पेला माझ्या हातीं देत ती म्हणाली,

'ह्यांतील पेयाचा साऱ्या विश्वावर अभिषेक कर! त्या थेंबाथेंबांतून तुझ्या कीर्तीच्या अमरगीताचे बोल निनादतील! मद्याचं विष होत; हे पीयूष आहे.'

इतकं बोलून तिनं माझ्या नजरेला नजर लावली. मी तटस्थ झालों. मला हलवेना—बोलवेना.

'जा! क्षणाचाहि विलंब नको. जा!' एवढं बोलून ती निघून गेली. तिच्या वाणींत वज्राचा वजनदारपणा, कट्यारीची धार, दावानलाची दाहकता, मदिरेची मादकता आणि तरीहि कुसुमाची कोमलता होती!

त्याला कितीतरी वर्षं लोटलीं. आज माझ्याजवळचं यशोधन पाहून कुणी माझ्याकडं संदेश मागायला येतात. त्या उडत्या पांखरांना मी लिहून देतों: "निळ्या अस्मानाच्या अंतरंगांत जशी मार्तंडाची प्रखरता आहे, मेघांची रणगर्जना आहे, बिजलीचं तांडव-नृत्य आहे, तशीच चांदण्याची शीतलता आणि इंद्रधनूची कमनीयताहि आहे; क्लेश कवटाळल्यावांचून यश नाहीं!"

आणि लिहून झाल्यावर मला तिची आठवण होते.

कारण ही सारी तिची अपेक्षा होती. कधींकाळीं तिची-माझी भेट झालीच तर—तर तिचे हात माझ्या गळ्या-भोंवतीं आणि माझे डोळे तिच्या चरणांवरती स्थिरावतील!

× ×

## २३. विकसन

तुझ्यावांचून सारा दिवस देह करपून जातो. सूर्याच्या प्रखरतेंत लाही होऊन पडलेल्या माझ्या मनाला भोंवतालच्या वातावरणाचा तर अगदीं वीट येतो. समोरच्या तटावर उदरंभरणासाठी एका पायावर ध्यानस्थ असलेला बगळा, कर्दमांत एकमेकांच्या गळ्यांत पडलेले कृमि-कीटक, समोरच्या डोहलींत बसून उगाच कावकावणारा कावळा, मधूनच माझ्या अंगाला स्पर्श करून जाणारं ढालीच्या पाठीचं कासव, माझ्याकडं निष्ठुरतेनं पहाणारी एखाद्या वृषभाची नजर—ह्या साऱ्या साऱ्यांच्या सान्निध्यांत दिवसभर मला जीवनाचा उबग येतो.

पण संध्याकाळच्या सावल्या पूर्व क्षितिजावर चढूं लागल्या, वायु-लहरींवर तरु-लता पिंगा घालूं लागल्या कीं माझे डोळे तुझ्या आगमनाकडे लागतात. त्या माझ्या दर्शन-वेड्या स्थितींत मला पाहून आकाशांतील एक-

एक तारका मिस्किलपणें मला चिडवते, 'बाईसाहेब, इतक्या कसल्या विचारवलयांत आहांत? आत्तांच येईल बरं तो!' तरी मी तंद्रींतच असतें. जीवनाचा उबग आणणाऱ्या दिवसाच्या साऱ्या वातावरणाचा मला विसर पडलेला असतो. अशा घटकेला तुझ्या शीतल स्पर्शासाठीं संकोचलेलं माझं अंग नि अंग महिरून येतं. तोंच क्षितिजाच्या तटावरून चोरपावलांनीं तूं येतोस आणि तुझ्या सहवासांत माझीं महिरलेलीं गात्रं विकसतात!

× ×

## २४. ओढ

तुझ्या भाव-कल्लोळाला मर्यादा आहे—भरतीच्या वेळी सागराच्या लाटांना किनाऱ्याची असते तशी. आणि त्या मर्यादेचं उल्लंघन तुझ्या हातून होत नाहीं, म्हणूनच माझ्या मनाची धांव अहर्निश तुझ्याकडं आहे. प्रमदेची प्रीति ही संयमी पुरुषाच्या विशाल भालीं सौभाग्यतिलकाचं स्थान मिळविण्यासाठीं धडपडत असते.

देव-दानवांनीं मंथन करून चौदा रत्नं बाहेर काढलीं तरी सागराचं 'रत्नाकर' हें नांव नामशेष झालं नाहीं. तसंच मेरूएवढ्या दुःखाच्या पोटांत तुला मिळ-

णारं मोहरीएवढं सौख्य अदृश्य झालेलं असुनसुद्धां तुझं मुख-मंडल काजळलं नाहीं. यांतच तुझ्या अंतरींच्या आशांची दीप्ति दिसून येते. मला माहीत आहे कीं, झुंजार वृत्ति ही करुणेची कींव आणि प्रेमाचं कौतुक यांच्या अपेक्षेसाठीं दारोदार हिंडत नाहीं. पण मग मी काय करूं? मला तुझ्याबद्दल जें वाटतं त्याला तूं काय म्हणशील? आसक्ति असती तर माझं हें जीवन कधींच गढुळलं असतं; अगर धरणीच्या उदरांत विरलं असतं. का तुला तुझ्या तांडवांत माझ्या लहरींतलि तंतुवाद्याची तरलता ऐकूंच येत नाहीं, असं मी समजूं? तुझं भाव-नृत्य संपण्याची मी किती वर्षं वाट पाहूं? अपेक्षापूरित उत्सुकतेची सांगता विवक्षित कालांतरानं होईल या जाणिवेंत मीं आजवर काळ कंठिला. पण यापुढं तुझ्या ओढींतील उल्हास सरून निराशेंतून उद्‌भवणारं वेड माझ्या मनाला लागेल असं मला वाटतं. त्या वेडाच्या लहरींत हेलकावत जर मी तुझ्या बाहु-पाशांत येऊन पडलें तर तें मी माझं भाग्य समजेन. नाहींतर तुझ्या संगमासाठीं अधीरलेलं हें मन पिसासारखं फुंकरीत मी शून्यांत विलीन होईन!

x x

## २५. कैफ

तुझ्या अचल वृत्तीचं मी मैत्रिणींत कौतुक करीं. पण मला मनापासून मात्र ती वृत्ति आवडत नसे. वाटे, तुझ्या आपुलकीच्या तालावर नाचत यावं, रंगावं, गुंगावं आणि तुझ्या विशालस्कंधीं मान ठेवावी. पण तुझ्या शब्दांत इंद्रधनुष्याची आकर्षकता असली तरी विजेचा झंकारहि असल्यामुळं तुझ्या स्पर्शासाठीं मन जवळ यायला भीत असे. झंझावातांत धरित्रीला लोटांगण घालणाऱ्या बांधावरील झुडुपाप्रमाणं तारुण्यांत आसक्तीनं वादळलेल्या मनांतील संकोच आणि भीति हीं कामिनीच्या कटाक्षांत आपलं अस्तित्व विसरतात, असा मनोव्यापार आहे ना? मग तुझ्या मनाची ठेवण अशी कशी? इतके दिवस मला या वागणुकीचं आश्चर्य वाटे.

आणि काल रात्रीं तूं आलास. आसमंतांत गौरी-गणपतीच्या संगीत सणांची रंगीत तालीम चालू होती. वर्षावानं हलकीं झालेलीं मेघांचीं हृदयं पर्णांतून आणि पागोळ्यांतून ठिबकत होतीं. तूं आलास तेव्हां काजळ ओकणाऱ्या टमरेलाच्या ज्योतींत प्राणार्पण करणाऱ्या पांखरांवर माझी नजर खिळली होती. तुला पहातांच मी घाबरलें, मला सांवरलें आणि म्हणालें,

'बाहेर पाऊस पडतोय ना?'

'म्हणूनच हें पांखरूं आंत आलंय!' तूं उत्तर दिलंस.

'पण अप्सरांचे पदर ज्यांनीं आपल्या पंखांनीं उडवावेत असं हें पांखरूं आहे!' मी पूर्वीच्याच आदरानं म्हणालें.

'त्यांतीलच ही एक आहे.' या तुझ्या शब्दांच्या आर्ततेंत माझी तृप्ति मला दिसली.

सकाळीं उठून पहातें तों टमरेलाभोंवतीं असंख्य पांखरं मरून पडलीं होतीं. पण त्यांच्यांत अजिंक्यपद मिळाल्याचा कैफ होता.

× ×

## २६. गैरसमज

स्वातंत्र्य-युद्धांत तिचं ऊर क्रांतीच्या ज्वालांनीं पेटलं होतं. आणि वाणी ओजस्वी गीतांनीं रसरसलेली होती. 'शुरू हुवा है जंग' हें गीत म्हणतांना पुढं टाकलेला तिचा उजवा पवित्रा आसुरी स्वामित्ववृत्तीला 'दूर हटो'चं आव्हान देत होता. त्या आव्हानांत असंख्य अनुयायांचा आत्म-विश्वास एकवटला होता. एकदां तर 'मुक्तिचौकां'त भरलेली सभा उधळून लावण्यासाठीं सोडलेल्या घोडे-

स्वारांच्या टांचांखालीं इतरांबरोबर तीहि चिरडली गेली. त्यामुळें कांहीं दिवस तिला रुग्णालयात राहावं लागलं. तितक्या अवधींत अनेकांना तिनं आपल्या राष्ट्र-गीतांनीं वेडं केलं. त्यांत तो होता. तो—अंतरींच्या तळमळीला साकार करण्याचा प्रयत्न करणारा एक युवक.

पुढं एका संघटनेंत दोघं एकत्र आलीं. तडफेनं त्यागाची पारख केली. दोघं 'सह'कार्यानं जन सेवेंत रमलीं. असेच दिवस गेले आणि एके दिवशीं सायंकाळीं ती त्याला म्हणाली,

'नको रे आतां हें जीवन. थकल्या देहांतील मनाला मोकळं हिंडावंसं वाटतंय आतां. समोरच्या त्या टेकडीच्या माथ्यावर घटकाभर निवांतपणें बसूं या! चल, येतोस?'

परंतु त्यानं शंका काढली,

'त्यागाच्या कपाळावरील घर्म-बिंदु पुसण्याकरितां सेवेनं पदर पुढं केला तर?—'

'तर काय?' तिनं कपाळाला आटी घातली.

'जनता काय म्हणेल?' त्यानं भीति व्यक्त केली.

'जनता? आपल्या 'सह'कार्यानं जनतेला आजवर विपुल जीवन मिळालं. यापुढं मला तूं हवास आणि तुला मी हवी असेन तर चल!' तिची तडफ कडाडली.

आज पस्तीस लाख वस्तीच्या एका शहरांतील खुराडेवजा खोलींत तीं दोन कबुतरं घुमत असतात. रसरसलेल्या शेगडींतील निखारे चिमट्यानें उचलून त्यावर पाणी ओततांना कधीं तिच्या ओठीं 'शुरू हुवा है जंग' हा चरण रेंगाळतो, तर कधीं संध्याकाळीं दिवसाच्या श्रमानं भिजलेला खादीचा अंगा काढतांना तो म्हणतो,

'हीं गरुडाचीं पिलं नव्हतीं; कबुतराचीं होतीं.'

'हें अगोदर कळतं तर इतक्या लोकांचा गैरसमज तरी झाला नसता.' ती कंटाळून उत्तर देते.

'आणि आपण जन्माचीं एकमेकांच्या गळ्यांतहि पडलों नसतों.'—सोन्याच्या पत्र्याचा दांत दाखवीत तो हंसतो.

× ×

## २७. पडदा

पौर्णिमेच्या रात्रीं समोरची हिरवळलेली टेकडी चांदण्यांत न्हात असली कीं खिडकीचा पडदा दूर सारून घटका-घटका मी तिच्याकडे पहात बसतें. कित्येकदां 'ते' माझ्या पाठीमागें येऊन कधीं उभे राहतात हेंहि मला कळत नाहीं. कधीं माझ्या गालावर टिचकी मारून

मला ते ताब्यावर आणतात आणि आपल्या बाहूंवर पेलीत म्हणतात, 'सिंधू, असं काय बरं? अशा जागरणानं तुझ्या डोळ्यांतलं चांदणं मावळणार नाहीं का? चल, तुझ्या अमृत-कलशांच्या अभिषेकांत माझीं स्वप्नं अशींच ह्या समोरच्या टेकडीप्रमाणें हिरवळूं देत.' आणि मग खिडकीचा व मनाचा पडदा पूर्ववत् सारखा केला जातो. पण किती वेळ?....

असं आज किती वर्षं तरी चाललेलं आहे. ज्याचं-माझं कधींच मीलन होऊं शकलं नाहीं त्याच्या विचारांत रमणं वेडेपणा आहे, हें मी जाणतें. पण ज्यांना आज मी जिवाच्या मोलाची वाटतें, तें मोल मला माझ्या अविनाशी प्रीतीमुळं मिळालं आहे. अस्मानाच्या अंतरींचा नीलिमा उत्कंठित मनानं प्राशन केल्यानंतरच पांखराला आपल्या इवल्याशा पंखावर क्षितिजं उल्लंघितां येतात. माझेजवळ आज जें आहे, तें त्याचें आहे. त्या ऋणाची जाणीव झाली कीं अशीच मी माझ्या मनाचा पडदा दूर सारून जीवनांतील चांदणं घटका-घटका पहात बसतें.

x x

## २८. आशीर्वाद

ज्या ज्या वेळीं ती भेटे, त्या त्या वेळीं ती उभी राहून मला अभिवादन करी. कटाक्षानं अगर मंदस्मितानं जें कार्य होण्याजोगं होतं त्याकरितां ती एवढी तत्पर कां, याचं मला कोडं पडे. वायुलहरींशीं लपंडाव खेळणारी कलिका देव्हाऱ्यांतील पूजासाहित्यांत दिसली तर पुजाऱ्याला जसं चुकल्यासारखं वाटावं, तसं मला होई. आपल्यांतील व्यक्तित्वाच्या एखाद्या पैलूचा प्रकाश नकळत तिच्या मनावर पडून ती आपल्याला मानीत असेल अशीहि मीं माझ्या संकोचित मनाची समजूत करून घेतली. तरी पण माझ्या चिंतनशील मनाच्या कोपऱ्यांत तिच्या लाडिकतेनं स्नेहाचं घरटं बांधलंच! पांढरा स्वच्छ परकर-पोलका तिच्या तांबुस अंगकांतीवर उठून दिसे. ओठांच्या ठेवणीवरून ती मितभाषी वाटे; परंतु तिचे डोळे—पुष्करिणींतील कमल-कुंजांतून भ्रमणाऱ्या मधुपांसारखे ते कसल्या तरी मधुर स्वप्नांना फुलवत असल्यासारखे दिसत.

—आणि त्याच हिऱ्यासारख्या हंसऱ्या डोळ्यांनीं आतां आपल्या पापण्यांच्या रेशमी जाळ्यांत ह्या नवरंगी दुनियेंतील एक हवं तें स्वप्न-पांखरूं गुंतविलेलं दिसत

होतं. तिच्या मनाच्या समाधानांत मितभाषी ओठांवरील संकोचाचे पापुद्रे विरघळून गेले होते. गालांच्या खळींतून संयोगिनीचे भाव हिंदळत होते. तिनं मला अभिवादन केलं. अगदीं पूर्वीइतक्याच तत्परतेनं तिनं आपले हात जोडले. परंतु नेहमींप्रमाणें आशीर्वादाच्या अपेक्षेनं जुळणाऱ्या तिच्या अंजलींत माझं मन विसावलं नाहीं. अजूनपर्यंत शकुंतलेसमोर आश्रमवासी कण्वाची भूमिका वठविल्याबद्दल तें स्वतःलाच दोष देत होतं.

× ×

## २९. काजळी

त्या रात्रीपासून समई लावतांना रोज मला तुझी आठवण होते. स्मृतीच्या तन्द्रींत माझं मन त्या शीतल आणि मंगल प्रकाशांत नाहत राहतं. आणि मग अंतरींचा एखादा अश्रू जेव्हां तिच्या ज्योतीवर पडून त्याचा चर्‌चर् असा आवाज होतो तेव्हां मी भानावर येतें.

त्या स्मृतींत एक वेगळी उत्कटता आहे. त्या रात्रीं तूं माझ्याकडे आलास तो नेहमींपेक्षां निराळ्या स्वरूपांत. कित्येक महिन्यांच्या आजारामुळं निस्तेज झालेले तुझे डोळे कशानें तरी पेटलेले होते. निमिषपळाला प्रस्फुर-

णाऱ्या तुझ्या ओठांना कसला तरी प्यास पडला होता. मी भावमूढ झालें. तुझं स्वागत कसं करावं मला समजेना. मी समईजवळ जाऊन बसलें. तुझ्या मनांतील भावना जाणून घेण्याचा मी प्रयत्न करीत होतें. इतक्यांत तुझा हात माझ्या कटीभोंवतीं गेला आणि मी—तुझ्याकडे पाहतांच तुझे भाव संकोचले. तरीपण डोळ्यांतील निखाऱ्यांची रक्षा झाली नव्हती. मनाशीं कसला तरी निश्चय करून तूं आपली करांगुली ज्योतीवर धरलीस; ती काजळत, जळत असलेली मला पाहवली नाहीं. म्हणून झडप घालून मीं तुझा हात पकडला. पण तुझ्या शक्तीपुढं मी हतबल ठरलें. माझा हात झिडकारून तूं तडक निघून गेलास.

तेव्हांपासून तूं माझ्याकडं आलाच नाहींस. रोज रात्रीं मनाला विसर पडावा म्हणून मी कांहींतरी वाचीत पडतें. पण वाचनापेक्षां त्या समईकडे पाहण्यांत माझा वेळ निघून जातो. तिच्या ज्योतींत मला तुझं भावदर्शन होतं. दहिंवरलेल्या मनांतील एखादा अश्रू ज्योतीवर पडून जेव्हां त्याचा आवाज होतो तेव्हां मी भानावर येतें. किती तरी वेळ सारखें वाटत राहतें कीं, 'ज्या तुझ्या बाहूंनीं माझ्या कमरेभोंवतीं मेखला केली होती, त्याचीच करांगुली ह्या ज्योतीवर तूं धरलीस, काजळ-

लीस. त्या आत्मक्लेशानं तूं काय मिळविलंस कोण जाणे! पण माझ्या मनाच्या कोपऱ्यांत मात्र त्या रात्रीपासून सारखी काजळी चढत आहे.

× ×

## ३०. स्पर्श

सकाळीं उठलें कीं कितीतरी वेळ मी आगाशींतील कठड्यावर रेलून बागेंतील पुष्प-लतांकडे पहात राहतें. आदल्या दिवशींपेक्षां त्या किती टवटवीत दिसतात हें पाहिल्याशिवाय मला राहवतच नाहीं. त्यांवरील कांहीं फुलं पूर्णपणें विकसलेलीं असतात. तर कांहीं उमलण्या-पूर्वींच धुळींत मिसळलेलीं असतात. पण या सर्वांवर विलसणारे दंवबिंदु पाहिले कीं मी बेचैन होतें. दंव-बिंदु म्हणजे निशेच्या कढलेल्या अंतःकरणांतील ग्रह-नक्षत्रांच्या वाटे दळलेलें वैभव! हें वैभव पृथ्वीवरील सुमनांच्या दलादलांवर अधिष्ठित होतं, म्हणूनच निशेला युगयुगांचं हें एकाकी जीवन जगतां आलं.

माझ्या जीवनांत सुद्धां असाच गडद अंधार आहे. कळायला लागल्यापासून तुझ्या किरण-शलाकेंत तेजोमय व्हावं असं मला प्रत्यहीं वाटतं. पण काय उपयोग?

तुझं तेज आतां माझ्यासाठीं नाहीं ! यौवनाच्या चढत्या घटकांत मला आशा होती कीं तुझ्या प्रीतीच्या चिंतनानं ओलावलेल्या पापण्या तूंच येऊन आपल्या चुंबनानं पुसशील आणि म्हणशील, 'हत् वेडी ! इतका कसला विचार करतेस? क्षितिजाचा कडा जिंकून आलेला हा शिकंदर ह्या कामिनीच्या कटाक्षानं कधींच जिंकला गेला आहे !' पण—पण ती आशा विफल ठरली. उगवतांच कैलासाचीं शिखरें दीप्तिमान् करणारं तुझं भाग्य....त्याची वांटेकरीण होण्याचं श्रेय ह्या हतभागिनीला कसं मिळावं? तरीपण मनाला एवढंच समाधान होतं कीं, 'अनंताच्या प्रदक्षिणेसाठीं निघालेला तूं.... तुझ्या दृष्टि-पथावर कोमेजत चाललेल्या माझ्या जीवित-पुष्पावरील अश्रू तूं आपल्या लोकरी स्पर्शानं पुसून टाकतोस, त्या स्पर्शानं रोमांचित झालेलं माझं मन कित्येक दिवस स्वतःला विसरून जातं.

× ×

## ३१. पाकोळी

माणसाचं जीवन ही अनेक उध्वस्त स्वप्नांची अडगळ आहे ! मन आपल्या विचार-विलासासाठीं प्रत्यहीं नवीन

इमले उभवीत असतं. पण पृथ्वीप्रमाणं परिस्थितीला देखील अनपेक्षित हादरे बसतात आणि तीराप्रमाणें अस्मान विदारणाऱ्या मनाला जिवंतपणीं आपलीच तिरडी वाहून नेण्याचा प्रसंग येतो! सायंकाळीं स्वच्छंद-पणें बागेंत बागडणाऱ्या फुलपांखरांपेक्षां एखाद्याच फुलाच्या पाकळ्यांत रमलेली मधमाशी पुष्कळदां माझं चित्त वेधून घेते. भाव-गीताच्या लहरीवर एखादी रस-तरंगिणी हेलकावतांना शोभून दिसावी तशी ती दिसे. माझ्या जीवनांत तूं आलीस, ती अशीच एखाद्या भाव-गीतासारखी. तुझ्या भाव-कोमल मनाचीं दलें मीं हळुवारपणें फुलविलीं आणि त्यांत समाधिस्त झालों. मला जाग आली तेव्हां तूं जवळ नव्हतीस. तुझं-माझं गुपित मात्र क्षितिजाच्या हिरव्या कुशींत हंसत होतं. तेव्हांपासून तुझं अस्तित्व ही माझ्या जीवनांत उध्वस्त स्वप्नांची अडगळ झाली आहे. आणि मन हें त्या अडगळीच्या अंधकारांत पाकोळीप्रमाणं भिरभिरत आहे!

× ×

## ३२. कावड

माझ्यावर तुझं इतकं प्रेम नसतं तर आज आहें तसा कदाचित् मी दिसलोंहि नसतों. कुठं तरी वाचल्याचं मला

नक्की आठवतं कीं, 'उत्कट आणि सात्त्विक प्रीतीच्या सौगंधानं भारलेलीं मनं कसल्या तरी चिरंतन प्रवृत्तीच्या चिंतनांत असतात. स्वतःला विसरून तीं मनं भोवतालच्या जगाचा भार वहात असतात.' परंतु असं असीम प्रेम लाभणें हा देखील एक योगायोग आहे. पहाटेच्या घटकेपर्यंत पुरुषार्थाला प्रीतीच्या कुशींत उबारा मिळाला तरच दिवसाच्या चढत्या उन्हाच्या आंचीनं अंगांतून घामाच्या धारा निथळत असतांना कर्तव्याचं ओझं वहायला दिक्कत वाटत नाहीं. कर्तव्य आणि प्रेम हें कावडीसारखं आहे. जीवनाच्या स्कंधीं टेकलेली ही कावड समतोल असेल तर आशा-आकांक्षांच्या तीर्थापर्यंतची मजल यात्रेकरूला सहज मारतां येईल. नाहींतर त्याला लवकरच थकवा येईल. तेव्हां तुझ्या प्रीतीच्या तोलाचं कार्य माझ्या हातून व्हावं म्हणून अहोरात्र मी भारवाही असतों.

× ×

## ३३. जाणीव

एकटी असलें कीं मी समुद्रकिनाऱ्यावरच फिरायला जातें. वेड्यासारख्या वेंचलेल्या नवरंगी शिंपल्या न्याहाळ-

ण्यांत माझी संध्याकाळ रंगते. धरित्रीचा कटिभाग लह-रींनीं मेखलाबद्ध करणाऱ्या सागराचं हृद्गत मला त्या शिंपल्यांत दिसतं.

चंद्रिकेच्या दर्शनानं हर्षभरित होणारा, स्वातीचं जीवन मोत्याच्या मोलानं मोजणारा रत्नाकर अहर्निश कुणासाठीं कढतो हें मला कळत नसलं, तरी त्याच्या कढण्यांत मात्र जगाचा संसार रुचिपूर्ण होतो याची मला जाणीव आहे.

तूंहि माझ्या जीवनांत हरघडी येतोस आणि जातोस, तुझ्या भाव-तुषारांनीं आर्द्र झालेलं, तुझ्या स्पर्शानं लहर-लेलं माझं जीवन घडीभर तूं फुलवितोस आणि जातोस. पण तुझ्या हर्षाची चंद्रिका मी नाहीं. तुझ्यावरील प्रेमा-मुळें भारावलेल्या माझ्या अश्रूंचं मोल तूं करीत नाहींस हें मी जाणतें; तरीहि हें वेडं मन तुझा जो घडीचा सहवास मिळतो त्याच कल्पना-सृष्टींत रमतं. परंतु त्या-मुळें बुडणाऱ्या घटिपात्राप्रमाणं आयुष्य रसातळाला जात आहे, याची सारखी जाणीव होते. निशेच्या काजळीनं ग्रासलेल्या संध्यारंगाप्रमाणं मनाचा विरस होतो, आणि मी एकटी—अगदीं एकटीच काळोख्या रस्त्यावरून घरीं येतें.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं मेजावरील सुबकशा शिंप-

त्यांची रास पाहून दादा थट्टेनं म्हणतो, 'सरिते, तुझ्या त्या सागराला म्हणावं, शिंपले कशाला हे? जगाचें कल्याण करणारे मोती तरी उधळ!'

मला दादाच्या त्या बोलण्याचा राग येत नाहीं, पण वाईट वाटतं. त्याला कसं सांगूं कीं तूंहि माझ्या जीवनांत सागरासारखाच आहेस! परंतु विश्वांतील जीवन-नौका भाव-तरंगावर नाचविणारा तूं...तुझं हृदय कुठल्या तरी प्रियदर्शिनीसाठीं लहरतं. ती....तीच जाणीव माझं मन सायंकाळच्या घटका उदासीन करते.

× ×

## ३४. द्विवचन

ऐन जवानींतील घटका-पळांत जिची स्मृति रंग भरते, ती यौवना जर खूप दिवसांनीं आपल्याला भेटली, तर काय बोलायचं हें पाठ असून देखील तें कसं व्यक्त करावं ह्याविषयीं मनांत गोंधळ माजतो. कंठांतून ओटां-वर येऊन थबकलेले शब्द, हळव्या त्या भावनांशीं रंगतां येत नाहीं म्हणून, नादरूप होऊं शकत नाहींत.

मी सौंदर्यासक्त होण्यास ज्या मुग्धा कारणीभूत झाल्या, त्यांत तुझं स्थान वरचं आणि वेगळ्या प्रकारचें

आहे. संस्कृत कवींच्या नाटकांतील नायिकेच्या ठिकाणीं असलेल्या सौंदर्य–लक्षणांपैकीं तूं कोणत्या लक्षणांनीं युक्त आहेस हें मीं कधींच पाहिलं नाहीं. पण सात आठ वर्षांपूर्वीं उपनगरानजीकचीं कोरीव लेणीं आपण पहायला गेलों होतों, तेव्हांचा प्रसंग मला आठवतो. भर दुपारीं लेणीं पाहून झाल्यावर कुंडावर मी आंघोळ करयास गेलों होतों. गिरिकंदरांच्या गुहेंतील गारव्यानं थंडगार झालेल्या त्या निळ्या जलाशयांतून एक-एक कलश भरून मी अंगाखांद्यावर ओतीत होतों. इतक्यांत स्वयंपाकासाठीं पाणी नेण्यासाठीं तूं आलीस आणि मला म्हणालीस,

‘हें काय?’

‘विश्वामित्राचं स्नान!’ मी म्हणालों.

‘तें स्नान घालण्याचा मान मेनकेचा आहे!’ तूं एखाद्या नाटकांतील नायिकेच्या अभिनयांत उत्तर दिलंस.

‘कोणतीहि महिला या वयांत आपल्याला अप्सराच समजते,’ या माझ्या मल्लिनाथीनं, माझ्या अंगावर पांच-सात घागरी ओतून तूं आपला राग व्यक्त केलास आणि निघून गेलीस.

त्या वेळचा अनुरागिणीचा तुझ्या अभिनयाचा प्रसन्न

आणि त्यानंतर परवां संध्याकाळीं दादरच्या टिळक-पुलाच्या माथ्यावर आपण पुन्हां भेटलों तो प्रसंग. खालून तीराच्या गतीनें आपली कर्कश शीळ फुंकीत जाणारी 'दख्खनची राणी', आणि वरून घरघरत जाणाऱ्या मालाची व माणसांची ने-आण करणाऱ्या अवजड मोटरगाड्या यांनीं तो प्रचंड पूलहि हादरत होता. दहा पंधरा पळं आपलीं अशींच गेलीं. आणि मग मीं उगाचच प्रश्न केला,

'आली नाहींस आमच्याकडं पुष्कळ दिवसांत?'

'अरे, नाहीं रे होत यायला! तशी मी मोकळी असतें-पण कंटाळा येतो बघ! तूंच ये ना कधीं तरी. बसूं बोलत निवांतपणें.' तूं अगदीं मोकळेपणानं आग्रह केलास.

'येईन हं!' मीं समाधान व्यक्त केलं.

आपलेपणानं ओथंबलेल्या संभाषणांतील त्या वाक्यांचं मी पृथक्करण केलं तेव्हां मला उमगलं कीं, 'प्रीति ही वात्सल्यानं ओलावलेल्या मातेच्या ओठीं जरी एकवचनी असली किंवा तपोवृद्धांच्या सत्कारप्रसंगीं तिचा उल्लेख जरी बहुवचनी होत असला तरी तारुण्यांतील मनांतले भाव ती जेव्हां जिव्हाळ्याच्या माणसाजवळ व्यक्त करते तेव्हां ती द्वि-वचनांत बोलते!'

x x

उद्यांच्या परिणामाची पर्वा करणारं मन जगाला आपल्या कर्तबगारीनं कधींच चकित करूं शकत नाहीं. मनाला एखादी गोष्ट पटली कीं साहसानं तीवर झेप घेतली पाहिजे. युद्धाप्रमाणें प्रीतींतहि विलंब हा नाशास कारणीभूत होतो. ॲर्नाल्ड बेनेटच्या 'मैलाचे दगड' या नाटकांतील स्त्रीपात्राच्या तोंडचं पुढील वाक्य मला आठवतं: 'लोकापवाद काय, आज आहे, उद्यां नाहीं. पण एका क्षणांत घडलेली चूक साऱ्या आयुष्याचा सत्यानाश करते.'

तुझ्या बाबतींत माझ्या हातून असंच झालं. तुला आठवत असेल, पण बहुधा नसेलच. त्या गोष्टीला कित्येक वर्षं होऊन गेलीं. तूं कांहीं कामानिमित्त आमच्याकडे आला होतास. तेव्हां दादा—माझे वडील—आम्हांला स्थूल-वाचनासाठीं नेमलेलं पुस्तक मला सूक्ष्म दृष्टीनं शिकवीत होते. त्यांची दृष्टि माझ्या वयापेक्षां विवेकाडे अधिक होती. त्यामुळें तुझ्या दर्शनानं झालेली माझ्या मनांतील कालवाकालव त्यांना उमगली नाहीं. तूं गेलास, तरी ते शिकवीतच होते. आणि मी?....हिरवळीवर अल्लडपणें वागडणारी हरिणी कसल्यातरी आवाजानं

चार-दोन उड्यांच्या टप्प्यांत टेकडीच्या माथ्यावर येऊन थबकावी तशी, दादांच्या खाकरण्यानं पुन्हां भानावर आलें आणि माझी नजर पुस्तकावर खिळविली. पण मन—तें तुझ्याबरोबरच बाहेर पडलं होतं. तेव्हांपासून या घटकेपर्यंत माझ्या मनांत तुझ्याशिवाय दुसऱ्या कुणींहि प्रवेश केलेला नाहीं. तूं माझ्यापासून खूप खूप दूर जात आहेस. तुझी कीर्ति कधीं तुझ्या सत्कारार्थ फुंकल्या गेलेल्या तुतारीच्या ललकारींत माझ्या कानीं येते, तर कधीं तुझ्या चहात्यांनीं तुझ्यावर उधळलेल्या फुलांतील सौगंधांतून वायुलहरींवर तरंगत येऊन मला सुखविते. परंतु तुझ्यासाठीं तळमळणारी मी आज 'मैलाचे दगड' मोजीत आहे. त्याचवेळीं जगाविरुद्ध बंड पुकारून मनाप्रमाणं वागलें असतें तर....पण तें साहस माझ्या रक्तांत नव्हतं, म्हणून तर ही अवस्था!

× ×

## ३६. तंतुवाद्य

राष्ट्र-पुरुषांची कीर्ति स्मारकरूपानं चिरंतन करण्याची कल्पना चांगली आहे. मोठमोठ्या शहरांतील चौकांत लोकांच्या डोळ्यांत भरतील इतक्या उंचीवर त्यांचे पुतळे

उभारले जातात. उद्योगशाळा, उपवनं, रुग्णालयं अगर वाचनालयं यांना त्यांचीं नांवं दिलीं जातात. अशा पुरुषांच्या चरित्रांतून तर राष्ट्राची चित्‌शक्ति जागी रहात असते. पण व्यक्तिगत प्रेमाची 'स्मृति म्हणून बांधलेली 'ताजमहाल' सारखी कलाकृति पाहिली कीं मला खेद होतो.

तुझं-माझं प्रेम तितक्या दर्जाचं नाहीं काय? स्वप्नांची झालर असलेल्या मायेच्या मच्छरदाणींत आपण अनके घटका जागविल्या आहेत. जीवनांत सुखाचं चांदणं फुलविलं आहे. म्हणून तुझ्या आठवणीनं मन चाळविलं जातं तेव्हां त्या भाव-लहरींत मी रंगून जातों. कधीं मनांतील एखादी कल्पना गीतबद्ध होते, त्या गीताचे चरण गुणगुणतांना कळून येतं कीं, प्रीति ही तुतारी नसून तंतुवाद्य आहे. तुतारीप्रमाणं दिशादिशांचीं अंतःकरणं थरारवून सोडणं हा तिचा धर्म नाहीं; तर तंतुवाद्याप्रमाणं रंगमहालाचे पडदे आपल्या भाव-लहरींनीं आंदोलित करणं हें तिचं वेड आहे.

× ×

N 4059

## ३७. मुहूर्त

मनाचं मोठेपण हें जीवनांत वांट्याला येणाऱ्या सुवर्ण-क्षणांवर अवलंबून आहे. मग ते क्षण हर्षाचे असोत वा खेदाचे असोत. त्यांत मनोभावाचा अर्क मात्र उतरायला हवा. माझं जीवन अशाच उत्कट भावमय क्षणांनीं अलंकृत केलेलं आहे.

दैनंदिनींतील दिनांक टरकावून टाकले तरी ते मनावेगळे थोडेच होतात! महिन्यांतील एखादा दिवस, आठवड्यांतील एखादी घटका, दिवसांतील एखादा क्षण मनाच्या शिलेवर आपले चिरंतन ठसे उमटवितातच! आणि मग निराश झालेला जीव त्या क्षणांचं एकांतांत पूजन करतो, काळयंत्राच्या कांट्यांतून सटकलेल्या त्या सर्वसामान्य क्षणांना देवत्व आणतो.

देव म्हणजे तरी काय?—विखुरलेल्या विचारांना आपल्या उत्कर्षासाठीं केंद्रीभूत करणारी एक मनोनिर्मित मूर्ति. तुझ्या प्रीतीला मी ह्याच कारणासाठीं माझ्या मनाचं अधिष्ठान मानतों. नेहमीं घडणाऱ्या स्मृतिदर्शनामुळंच मी अच्युत राहिलों आहें. माझ्या भाववेड्या मनाला स्थिरता आणणारे ते मंगल क्षण मी मुहूर्ताच्या भावनेनं एकांतांत पूजीत असतों.

× ×

जित्राच्या मैत्रिणीशीं देखील इतक्या मोकळ्या मनानं तूं कधीं बोलली नसशील. माझ्या हस्तिदन्ती बटणांशीं खेळत तूं आपल्या अंतरंगाचा एकेक धागा मला उलगडून दाखवीत होतीस. मधूनमधून माझी चलबिचल होत असलेली पाहून, मनाचा विरस होऊन, तूं विचारलंस,

'अस्सं काय? तुम्ही त्यांच्या ठिकाणीं असतां तर!—'

'तर कसा वागलों असतों, हेंच ना?' मी.

'हो! हो! तेंच मला हवं आहे.' तूं.

'तें काय सांगायला हवं? दारांत फुललेला हा प्राजक्ताचा सडा तसाच कोमेजूं देण्याइतका मी कधींच अरसिक नव्हतों!' मीं तुझं सांत्वन केलं.

'पुरुष असे नसतात पण!' तुझी अनुभूति थरारली.

'नसतील. पण तुझ्यासारख्या सखीच्या सहवासांत कुणीहि आपली कात टाकावी इतकी तूं—'

या अपूर्ण उत्तरानं तुझं ऊर फुलून आलं. डोक्याखालीं परस्परांत गुंफलेली माझ्या बोटांची मिठी सैल पडली. पुढील कांहीं क्षण भावनेच्या झंझावातानं बावरलेल्या दोन मनांच्या मीलनांत गेले. पण माझ्या मनांतील काहूर

डोळ्यांत उतरतांच, कांहींतरी मनांत येऊन तूं मागं सरलीस आणि दरवाजाची कडी काढलीस.

तेव्हांपासून स्त्रीस्वभावाबद्दल मी माझ्या मनाशीं अगदीं खूणगांठ बांधून ठेविली आहे कीं, स्त्री कुणाशीं कितीहि खुल्या दिलानं बोलली तरी तिच्या मनाच्या दालनाला पिढ्यानुपिढ्या पकड घेणारी संस्कृतीची अशी एक कडी असते कीं, जी सहसा कुणाला काढतां येत नाहीं !

× ×

## ३९. नजराणा

मानसिक क्लेशाचं कवच फोडून बाहेर आलेल्या कलाकृतींतच रसिकांच्या भावशक्तीला आवाहन करण्याचं सामर्थ्य असतं, याची प्रचीति मला तिच्या पत्रावरून आली. 'यौवनाचा बगीचा' या माझ्या कादंबरीवरील अभिप्राय तिनं पुढील शब्दांत कळविला होता—

'तुमची कादंबरी मीं एका बैठकींत हातावेगळी केली. वैशाखावर अनुरक्त झालेल्या वासंतीच्या मनांतील भाव तुम्हीं ज्या हळुवारतेनं चितारले आहेत, ती हळुवारता स्त्रीच्या मनाची आहे. तुम्हींच उष्टावलेली कल्पना उच-

ढून मी असं म्हणेन कीं, एखाद्या फुलवेड्या स्त्रीनं अधाशीपणें परसांतील प्राजक्ताचा सडा जसा आपल्या परडींत वेंचून घ्यावा, तसं तुम्हीं—(हो! मी 'तुम्हीं' असं मुद्दामच म्हणतें. कारण, लेखकाचं मन कुठल्या तरी पात्राच्या ओठीं लपलेलं असतं.)—वासंतीच्या शब्दांतून स्त्री-हृदयांतील साऱ्या उत्तमोत्तम कल्पना वदविल्या आहेत. पण मला वाईट वाटलं तें तुमच्या वैशाखचं. जगासाठीं अविरत श्रम करणाऱ्या वैशाखची पत्नी होण्यास वासंतीसारखी स्त्री राजी असतांना तो तें सौभाग्य नाकारतो आणि म्हणतो, 'सोन्याच्या पिंजऱ्यांतील सारिकेचे सूर रविकिरणांत विलीन होणाऱ्या चंडोलाच्या कानीं पडले तर...' हें तुमचं वाक्य ध्येयवादाच्या दृष्टीनं ठीक असलं, तरी माझा अनुभव वेगळा आहे! कांहींतरी करून दाखविण्यासाठीं तळमळणाऱ्या सत्यसृष्टींतल्या वैशाखला वासंतीसारखीच सहचरी हवीशी वाटते. परंतु सौंदर्यशालिनीला रुक्ष जीवन कंठणारा जोडीदार नकोसा होतो. माझ्या दृष्टीनं तुम्हीं कादंबरीचा शेवट शोकपर्यवसायी करावयास नको होता. त्यामुळंच तर ती वाचवत नाहीं आणि अखेरपर्यंत वाचल्याशिवाय राहवत नाहीं! एकंदरींत, वाचकाच्या मनाला कैफ आणणारी ही तुमची कलाकृति हातावेगळी

केल्यापासून मला सारखं वाटत आहे कीं, 'नजराणा' देण्याइतकी ही तुमची कलाकृति उत्कृष्ट उतरली आहे.'

ट्रंकेच्या झांकणाच्या आंतील पट्टींत खोंचून ठेवलेलं हे रसग्रहणात्मक पत्र जवळ असल्यावर दुसरा नजराणा हवाच कशाला? कारण स्त्री-हृदयापेक्षां सुखद असं जगांत काय आहे?

× ×

## ४०. पाऊलवाट

कधीं कधीं तुझं सारं व्यक्तिमत्व ओठांवर येऊन गुणगुणूं लागतं आणि म्हणतं: 'किती वर्षं मला असा अज्ञानांत ठेवणार? सारं सारं तुला जें माझ्याबद्दल वाटतं तें शब्दबद्ध करून टाक!' पण तें शक्य आहे का? आणि समज, तें शक्य झालं तर तुझ्या चिंतनांत क्षणाक्षणाला मला मिळणारा आनंद फिरून कधीं मिळेल का? नाहीं! क्षितिजाच्या निळसर रेषेवर मानवाची प्रज्ञा नेहमीं अमूर्त चित्रांचं हवं तसं स्वरूप चितारीत असते. विविध भावनांची रंगसंगति जुळवून पापण्यांच्या कुंचल्यांनीं चित्रें रंगविण्यांत आणि पुसण्यांत प्रतिभा सदैव गढलेली असते, हें खरं आहे. पण तुझं

(अर्थात् मला पटणारं) व्यक्तिमत्त्व ज्या घटकेला कोणत्याहि स्वरूपांत मी साकार करीन, त्या घटकेपासून माझ्या मनांत एक पोकळी निर्माण होईल. खरा भक्त मंदिरांत गर्दी करणाऱ्या वारकऱ्यांच्या देखत आपल्या आवडत्या दैवताच्या नांवाची नौबत वाजवीत नाहीं. देव्हाऱ्यांतील कोपऱ्यांत एकतारीच्या सुरावर तो आपले भाव आळवीत असतो. तुझं व्यक्तिमत्त्व मी जें मानतों तें अशाच प्रकारचं आहे. पण तें ज्या मंदिरांत आसनस्थ झालं आहे तें माझं मनोमंदिर गजबजलेल्या हमरस्त्यावर नाहीं. वनराईतून वेडींवांकडीं वळणं घेत जाणाऱ्या पाऊलवाटेवर आहे. त्या पाऊलवाटेचा रस्ता झाला तर भजनाच्या दिंड्यांनीं तें मंदिर निनादून जाईल; आणि तुझ्याबद्दल मला वाटणाऱ्या वेगळेपणांतील उत्कटता कमी होईल. तेव्हां माझीं एकट्याचींच पावलं तिच्या धुळींत उमटूं देत.

x x

## ४१. पाचोळा

तूं होऊन माझ्याकडे कधींच आला नाहींस आणि त्याचं माझ्या मनाला कांहीं वाटलंहि नाहीं. माळरान

फुलवीत जाणारा झरा तीरावरील पर्णकुटीच्या उंबरठ्यापाशीं कधीं घोटाळला आहे काय? फुलणं आणि फुलविणं हाच त्याचा धर्म! मग त्याच्या सहवासांत कुणीं रहावं वा न रहावं. पण अजूनपर्यंत तूं माझ्यापासून हांकेच्या अंतरावर होतास. तुझ्या जिव्हाळ्यानं माझी पर्णकुटी विशेष प्रकारच्या आनंदानं फुले. तो आनंद यापुढं कधींच नाहीं का दरवळणार?

मला हें माहीत असतं तर मीं तुझी अपेक्षा केली नसती. पण अविनाश, तुझ्या डोळ्यांतील राग मी ओळखला नाहीं. जातांना तूं म्हणालास, 'यातनांची परमावधि झाल्यावरच मी तुझ्याजवळ दानाची याचना केली! भुकेनं आंतड्यावर आतडीं चढल्याशिवाय खरा याचक आपलें भिक्षापात्र पुढं करणार नाहीं!' तुझी ही याचना अखेरची आहे हें मला आधींच कां नाहीं सांगितलंस? छे! तुझ्या हातून जें स्वप्नांतहि घडलं नाहीं तें मी तुझ्यापासून जागेपणीं कसं अपेक्षूं? नाहीं. मीच अपराधी आहें. तूं उंबरठ्यांत पाऊल टाकलंस तेव्हांच तुझा चेहरा उतरला होता. तुझ्या मनांत कसलीतरी विलक्षण कालवाकालव चालली होती. तुझ्या शब्दांत नेहमींचा ठाशीवपणा नव्हता. दिवाणखान्यांत तूं सारखा येरझारा घालीत होतास. जें नेमकं तुला माझ्याजवळ

बोलायचं होतं, तेवढंच गाळून तूं इतर अवांतर गोष्टी सांगत होतास. या सर्वांवरून तुझ्या मनाची कातरता मीं जाणायला हवी होती. पण, कां कोण जाणे, माझ्या तें लक्षांत आलंच नाहीं. अविनाश, केवढी रे मी अभागी ! जगाच्या बागेंतील विषवृक्षाचीं फळं दुर्दैवानं तुझ्या मुखीं पडलीं ! पचनीं न पडलेलं तें विष उतरविण्यासाठीं तूं माझ्याकडे अमृताची मागणी केलीस. आणि द्यायचं असून तें दान माझ्याकडून दिलं गेलं नाहीं ! माझ्या परसांतील प्राजक्ताचा सडा देखील तुझ्या प्रेमळपणानें परिमळून जायचा. पुढील दारची कृष्ण-कमळाची वेल—तूं गेल्यापासून तिच्यावर एकहि फूल आलं नाहीं. तुझ्याबरोबर तूं आपलेपणा घेऊन गेलास. आतां ही पर्णकुटि—तिच्या अंवतीभंवती सारा पाचोळा सांचला आहे. संध्याकाळ झाली कीं प्रतीक्षा करणारं वेडं मन म्हणतं, 'आतां तो येईल !' म्हणून सारी रात्रभर मी तुझ्यासाठीं फाटक खुलं ठेवतें आणि पहांट झाली कीं अंगणांतील पाचोळ्याबरोबर मनाचा पाचोळा झाडून टाकतें ! तूं गेल्यापासून हें असं चाललं आहे !

× ×

संयम आणि संकोच हे संतांचे आणि स्त्रीचे स्वभाव-धर्म आहेत, अशी माझी कितीतरी वर्षं कल्पना होती. पण तुझ्या परिचयानं वेगळा अनुभव आला. ते दोन्हीही धर्म तुझ्यांत संगमित झालेले पाहून धन्य वाटलें. तुझ्या रसनेच्या लालित्यांत माझं मन फुलूं लागतं. त्याच्या थरथरत्या पाकळ्यांना वाटतं कीं, 'ह्या मानस-विहारी कलहंसाचं आपण, घटकेचं का होईना, सिंहासन व्हावं! तो मान आपल्याला मिळावा!' इतके दिवस मी केवळ ह्या कल्पनेवर जगत होतें. कारण, आज ना उद्यां कधीं-तरी तुझं–माझं मीलन होईल, अशी मला आशा होती.

परंतु चिरवंचित संगमोत्सुक मन लौकर थकतं. तशी तुझ्या चिंतनानं आतां मला ग्लानि येऊं लागली आहे. तुझ्या मायेच्या विशाल पंखांखालीं जरी असंख्य जीवांना दिलासा वाटत असला, तरी मी—मला अशा रीतीनं तूं उपकृत करावंस, असं कधींच वाटलं नाहीं. एक तर, तुझ्या पदतलीं पदोपदीं तुडविल्या जाणाऱ्या अगणित धूलिकणांप्रमाणें, माझ्याकडे तूं दुर्लक्ष करावंस, अगर तुझ्या बलशाली बाहूंशीं स्पर्धा करणाऱ्याला दिगंतराला पोंचवील अशी शक्ति देणारी मी तुझी जयश्री असावं!

तुझ्या संयमानं अनेक जण तुझे स्नेहांकित राहतील. पण माझ्या बाबतींत तुला वाटणाऱ्या संकोचामुळे मनाचा कधींकधीं इतका विरस होतो कीं, वाटतं, तुझ्या पायाची धूळ कपाळाला फासावी आणि वेड्यासारखं वाट सांपडेल तिकडे धांवत सुटावं. मनांत येईल तें बरळावं. पण त्यानं तुझी रक्षा होईल! आपल्या नात्याविषयीं जग साशंक होईल. तें नको! त्यापेक्षां मी हा मनोदाह सहन करीन. मला अज्ञात राहूं दे! जगाला सुगंध आणि शीतलता देणारं चंदनाचं खोड लोक काळजीनं बाळगतात आणि जिच्या स्पर्शामुळें तें परिमळतं ती सहाण—तिला मात्र माजघरांतील अंधारांत जागा मिळते!

× ×

## ४३. उमरखय्याम

"घराचा उंबरठा ही, कीर्ति आणि प्रीति यांची सीमारेषा आहे. याच उंबरठ्याच्या सरहद्दीवर उभं राहून स्त्रीनं आपल्या पुरुषाला कधीं कटाक्षानं दिग्विजयार्थ सिद्ध करावयाचं असतं, तर कधीं श्रमपरिहारासाठीं कुशींत घेऊन कुरवाळावयाचं असतं. ज्या पुरुषाच्या जीवनाची प्रेरक शक्ति अशी उंबरठ्यांत तेजाळत राहते, त्या पुरु-

षाचें भाल रक्ताच्या तिलकानं अलंकृत करण्यासाठीं शेकडों सुवासिनी पुढं सरसावतात. शयन-मंदिरांतील जागत्या दैवतानं प्रसाद म्हणून दिलेल्या विड्यानं तन-मन रंगलं कीं चित्तचकोर दुसऱ्या कुठल्या चंद्रिकेसाठीं ताटकळत राहील काय? त्याचं जीवन मग उंबरठ्या-बाहेरील जगासाठीं खर्च होणार."

पुरुषार्थविषयक ग्रंथांतील हे विचार वाचल्यापासून मी अस्वस्थ झालों आहें. आवड कुणाला नसते? पण आवडीप्रमाणें निवड करण्याची प्रत्येकाची परिस्थिति असतेच असं नाहीं. मीं तुला पाहिल्या क्षणापासून तूं मला आवडूं लागली आहेस. आजहि तुझं तें सौंदर्य लवमात्र कमी झालेलं नाही. चारचौघांपेक्षां एखादी विशेष गोष्ट जेव्हां मी अंगच्या गुणांमुळं पार पाडतों, तेव्हां कांहीं हितचिंतक कौतुकानं म्हणतात, "मोठा होणार हा उद्यां!" त्या क्षणी मला मात्र तुझी गैरहजेरी जाणवते; आणि वाटतं, तुझ्यावांचून तें बेगडी मोठेपण नको! कुसुमाची पाकळीन् पाकळी आपल्या मधुगीतानं खुली करावी, ही मधुपाची मनीषा असते. पण नेहमींच ती पुरी होते असं थोडंच आहे! तेव्हां तुझ्यावांचून मिळणाऱ्या प्रासादांतील वैभवापेक्षां विजनांतील एकांतांत तुझ्यावर लिहिलेल्या रुबायाच मला विरंगुळा देतील!

आणि जगाला कदाचित् त्यांत द्राक्ष-कन्येच्या विरहानं वेडा झालेला उमरखय्याम सांपडेल!

× ×

## ४४. मी आलें आहें

मीं तुझ्याकडं यायला नको होतं, हें माहीत असूनसुद्धां मी आलें आहें. माझ्यावर तासन्तास खिळणारे तुझे डोळे मला पाहतांच आतां आपल्या पापण्यांचीं तावदानं लावून घेतात! 'हें असं कां?' याचा विचार मी करतें तेव्हां मला शाळेंत शिकलेली एक इंग्रजी कविता आठवते. रणांगणांत मृत्युमुखीं पडलेल्या एका वीराचं प्रेत घरीं आणतात, त्यावेळीं त्याच्या पत्नीच्या मनाची झालेली अवस्था तींत वर्णिली आहे. कवि म्हणतो, 'तिला अश्रू तरी ढाळले पाहिजेत, नाहींतर मेलें पाहिजे!'

माझ्या दर्शनानं तुझी अवस्था ह्या कवितेंतील स्त्रीच्या मनासारखीच हतबुद्ध होत असली पाहिजे! पण तूं नि मी असं परस्परांना न भेटण्यांत किती दिवस घालवायचे? हें काय? मला पाहून तुला रडूं कोसळलं? तुझ्या प्रतिमेंत पापाणाची विषण्णता आली? शिळेलाहि नाचायला लावणारं

तुझ्या रसनेंतील लालित्य गेलं कुठं? मला तूंच बोलकी केलीस आणि आतां कोरीव-लेण्यांतील मूर्तीसारखा तटस्थ झालास? तुला बोलका करण्याचं सामर्थ्य माझ्या शब्दांत नाहीं. तुला रिझविण्याचं सामर्थ्य माझ्या सुरांत नाहीं. परंतु माझ्या डोळ्यांतील ज्या दीप्तीनं एकदां तूं तेजाळून निघालास ती तशीच आहे. पण तूं डोळे उघडून पाहशील तर ना? तुझ्यापासून दूर राहणं यापुढं मला तरी शक्य नाहीं. आणि मी तर तुझ्याकडे यायला तुला नको आहे! क्षणांत भोग्याची आणि क्षणांत भगवंताची भूमिका घेणाऱ्या श्रीहरीशीं वागतांना गोपींना असाच पेंच पडला असावा!

माझ्या सर्वस्वाची जर तुला अपेक्षा होती तर तें तुझ्या स्वाधीनचं होतं. पण 'पांगळाहि पर्वत उल्लंघूं शकतो!' या वाक्याच्या पाठांतरानं श्रमशक्तीचा विकास होत नाहीं! आज तुझ्या पायाशीं जें आलें आहे त्याला उचलून घे! माझं प्रेम हें तुझ्या आराधनेनं तुला दिलेलं वरदान आहे. तुलाहि एकेकाळीं तें तसंच वाटत होतं. आज तूं तो शाप समजतोस! याला मी काय करूं? तुझ्या दर्शना-साठीं तळमळत होतें म्हणून मी आलें आहे. जें जें तुला देतां येणं शक्य आहे तें तें मी आज देणार आहें. डोळे उघड! तुझ्या रेशमी पापण्यांनीं माझ्या मनांतील गुपितं पुन्हां एकदां रंगूं देत. माझ्या मनाच्या जादूगारा,

तुझ्या नजरेची किमया माझ्या देहावरून फिरल्याशिवाय नाहीं रे मी फिरून कांतिमान् होणार! तुझ्याकडं यापुढं मी यायला नको असेन तर नाहीं येणार; पण तूं चाल-विलेल्या ह्या आत्म-यज्ञांत तुझ्याजवळील समिधांबरोबर माझीं हीं अश्रु–फुलं टाक! त्यांत माझं जळतं हृदय आहे. आणि हीं फुलं टाकतांना माझ्याकडे डोळे उघडून पहा! मी पुन्हां येणार नाहीं. केवळ तुझा हा आत्म–यज्ञ पाहण्या-साठीं मी आलें होतें!

× ×

## ४५. हिरवा रंग

रंगांच्या आवडीचा विषय निघाला कीं मी मौन धारण करतों. चारचौघांत त्यामुळं गैरसमज मात्र पसरतो कीं, 'हा अरसिक आहे.' होईना का त्यांचा गैरसमज. आपल्या आवडत्या रंगाचं कारण समजलं की, त्याचं हसूं होण्यापेक्षां न बोललेलं काय वाईट? पण इतरांप्रमाणं माझाहि एक आवडता रंग आहे; आणि तो म्हणजे हिरवा. त्या रंगावर माझं मनस्वी प्रेम आहे. चिमण्या पांखरांच्या शिंपल्याएवढाल्या पंखांत आकाश उल्लंघण्याची शक्ति ओतणारा अस्मानी रग, ब्रह्मगिरींच्या गुहांतून हजारों

वर्षं तपश्चर्या करणाऱ्या ऋषि-महर्षींच्या जटादाढीचा पावित्र्यदर्शक हिमधवल रंग, अंतरींच्या आसक्तीनं एकत्र आलेल्या युगुलांच्या मीलनाचा गुलाबी रंग....हे सारे रंग त्या त्या प्रवृत्तींचीं प्रतीकं असतील, पण निवड करायची झाली तर माझं मन तिकडे वळत नाहीं.

तुझं सौंदर्य मनांत भरल्यापासून त्याला अनुरूप अशी वेषभूषा मी मनांतल्या मनांत नेहमीं करीत आलों आहें. अभिजात सौंदर्यामुळं लक्तरं जरी देहाभोंवती गुंडाळलींस तरी तूं दहाजणींत उठून दिसतेस. पण मला दहाजणींपेक्षां तुझ्यांत जें वेगळंपण दिसलं, त्या ठिकाणी हिरव्या रंगाहून वेगळा रंग खुलून दिसणारच नाहीं. शुभ्र वस्त्र नेसलींस कीं जान्हवीचं पावित्र्य तुझ्या डोळ्यांत उतरतं, अस्मानी साडी परिधान केलींस कीं स्वर्गांतील एखाद्या अप्सरेची लडिवाळ किशोरीच आली आहे, असा भास होतो, छापील पातळ तर नवरंगी स्वप्नं उधळीत येणाऱ्या वनमालेप्रमाणं तुझ्या सौंदर्यांत भर टाकतं! तरीहि तुझं खरं सौभाग्य हिरव्या रंगांत आहे. चंदेरी पदराचं हिरव्या रंगाचं पातळ एखाद्या कापडाच्या दुकानांत तारेवर टांगलेलं पाहिलं कीं, मनांत नको तें येऊन जातं. कधीं कधीं वाटतं कीं तुला सांगावं कीं तूं हिरवाच रंग पसंत करीत जा. तुला तो अतिशय शोभून

दिसतो. पण मग मी तुझा सर्वच बाबतींत इतका विचार करतों हें तुला कळेल. आणि जगाला जसा माझा आवडता रंग कळूं नये तसंच, "तुलाहि मी इतकी जवळची मानतों" हें कळूं नये. म्हणून मी मौन धारण करतों. त्या मौनांतून मिळणारं समाधान....अनुभूतीच हवी तें जाणायला.

× ×

## ४६. वाङ्निश्चय

त्या दिवशीं वर्गांत अनेक कल्पना मी विद्यार्थ्यांपुढं पिंजून पिंजून ठेविल्या. माझें तें बहुरूपी विस्तार-कौशल्य पाहून सारा वर्ग चकित झाला. पण लगेच एका चाणाक्ष विद्यार्थ्यानं शंका विचारली: 'प्रत्येक मेघाला रुपेरी किनार असते, म्हणजे काय?' दहा-पंधरा क्षण मी गोंधळलों, माझ्या डोळ्यांपुढं तुझे माझे स्नेह-संबंध उभे राहिले. तुझ्या पत्रांतील पुढील परिच्छेद मी मनां-तल्या मनांत पाठ म्हटला :—

"श्याम, (पुढं 'कांत' असं मुद्दामच लिहीत नाही, कारण मी कांहीं तुझ्या कुशींत आपलं तेज लपविणारी वीज नव्हे) तूं म्हणतोस अलीकडे मनाला विपण्णता

येत चालली आहे. पण मला तुझी तीच विषण्णता आवडते. तुझ्या विशाल भालप्रदेशावर ठाण मांडून बसलेली धीरोदात्तता पाहिली कीं मला क्षितिजाच्या धारेवर स्थिरावणाऱ्या काळसर मेघाची आकृति दिसूं लागते. केवळ दुसऱ्यांचीं दुःखं दूर राहून गाणारा कवि श्याम मला नको आहे. तर तीं दुःखें दूर व्हावींत म्हणून गर्जून आवर्जून सांगणारा, त्या दुःखांना कारणीभूत होणाऱ्यांवर विजेचं आसूड ओढणारा घनश्याम मला हवा आहे. जा! अस्मान-भेदी गिरिशिखराशीं संघर्ष करणाऱ्या मेघाच्या वेगानं पुढं हो! ग्रीष्माच्या तापानं कोरडी पडलेलीं सरितांचीं पात्रं तुझ्या जलानं आकंठ भरोत. पण श्याम, तुझ्या आत्मदानांत विराम पावणाऱ्या विजेचं स्थान माझंच आहे ना?"

मी विचारांत पडलेला पाहून वर्गांत गडबड सुरू झाली. कुणी शंका विचारणाऱ्या विद्यार्थ्याकडे कौतुकानं पाहत होतं, तर कुणी आपल्या लाडक्या गुरुजींवर अशी पाळी आली म्हणून माझ्याकडे केविलवाण्या नजरेनें पाहत होते. पण तुझ्या रूपाशीं समरसलेल्या माझ्या प्रतिभेला पुढील ओळी सुचल्या: 'ह्या ठिकाणीं मेघ आणि त्याला रुपेरी किनार देणारी बिजली हीं दोन प्रतीकं आहेत. हें विश्व सस्य-श्यामलां सुजलां सुफलां

करण्यासाठीं आत्मदान करणारा पुरुष हा मेघ असून त्याचं जीवन निष्ठेनं तेजाळणारी स्त्री ही वीज होय. तेव्हां प्रत्येक मेघाला रुपेरी किनार असते हें वाक्य बदलून 'काळया मेघाला रुपेरी किनार असते' अशी त्यांत सुधारणा करा! तेज हें त्याग करणाऱ्याच्या मुखमंडलावर खेळत असतं.'

ह्या स्पष्टीकरणानं वर्ग पुन्हां निःशब्द झाला. घंटा होऊन गेली तरी मुलं उठत ना. शेवटीं मीच उठलों, तेव्हां विद्यार्थी उठले. माझ्या मागून येणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थिनींत कुणीतरी बोललेलं मीं ऐकलं, 'कल्पनाविस्तार करावा तर ह्यांनींच.' त्याच क्षणीं माझा वाङ्निश्चय ठरला आणि मी तुझा श्यामकांत झालों.

x x

## ४७. पारख

तुझ्याकडे आलों तेव्हां मन मोकळं करण्यापलीकडे माझा कसलाच हेतु नव्हता. मी आलों कीं तुला बरं वाटतं एवढंच मीं तुझ्या हालचालींवरून हेरलं होतं. पुष्कळ दिवस मनांतले गढुळलेलें भाव तूं घटकाभरांत उपसून टाकलेस आणि भावपूर्ण डोळ्यांनीं माझ्याकडे

पाहिलंस. हें सारं करतांना तुला मी इतरांपेक्षां वेगळा वाटत होतों. अनपेक्षित चांगुलपणा मिळाला तर तो कोण नाकारील? मी फक्त हुंकारच देत आहे हें पाहून तूं म्हणालीस, 'अस्सं काय? तुम्ही पण बोला ना?'

'मी? मी काय बोलूं? असे अनुभव मला कधीं–कधींतरी येणं शक्य आहे काय?' मीं हंसतच उत्तर दिलें.

'हंसण्यावारी नेऊं नका! तुमचं काय मत आहे? कळायला लागल्यापासून ह्या भुंग्यांनीं सारखा धिंगाणा घातलाय् बघा.' तूं काकुळतीनें म्हणालीस.

'मी पण त्यांतीलच एक ठरेन कीं उद्यां!' मीं शंका काढली.

'नाहीं, तुमच्याबद्दल माझी खात्री आहे. तुम्ही तसे नाहींत.' तूं त्या शंकेचं निरसन केलंस.

'मी इतरांसारखा नाहीं.' ह्या तूं दर्शविलेल्या विश्वासाच्या जोरावरच मी त्या दिवशींच्या पाहुणचाराची लज्जत घेतली.

हव्या त्या माणसाशीं आपलें मनोगत मोकळं केल्यावर येणाऱ्या गुंगींत तूं वावरत होतीस. उल्हासानं होणारी तुझी प्रत्येक हालचाल बोलायचं राहिलेलं जणूं बोलून टाकीत होती. जेवणं झाल्यावर आपण पुन्हां बोलावयास बसलों, पण त्या बोलण्यांत जीवनांत विरघ-

ळलेल्या ढेकळांचा गढूळपणा नव्हता, सिंधुलहरींचं नृत्य होतं. आकाशाच्या मध्यावरून रात्र उतरूं लागली तसं आपलं बोलणं संपत आलं. पण जिव्हाळ्यानं बांधलेल्या दोन जीवांचे बंध परस्परांना सारखे हिसके देत असतात. त्या हिसक्यांनीं मनांतील भाव हिंदकळतात. सारी रात्र आपण तशा तगमगत्या मनानं जागून काढली. पहांटेच्या कोंबड्यानं जगाला जागे होण्याची ललकारी दिली. शेजारच्या घड्याळांत गजर झाला तेव्हां खरी माझ्या थकलेल्या मनाला निशा चढली. त्या निशेंतच तुझं पुढील वाक्य 'तुमच्याबद्दल माझी खात्री आहे. तुम्ही तसे नाहींत' मनांत घोळत होतं. सकाळच्या चहाच्या वेळीं मी म्हणालें, 'आतां मला बोलायचं आहे.'

'बोला ना!' तूं म्हणालीस.

'परस्परांवर प्रेम करणाऱ्या दोन जीवांनीं आपल्या कथा नेहमीं दिवसा रंगवाव्यात. रात्रींच्या घटका चंचल असतात. चंद्रकिरण फसवे असतात. खऱ्या रंगाची त्या वेळीं पारख होत नाहीं.' माझ्या ह्या अनुभूतिपूर्ण वाक्यानं तुझे भाव बदलले. तेव्हांपासून आजपर्यंत तूं माझ्याविषयीं कसलंहि मत व्यक्त करण्याच्या फंदांत पडली नाहींस.

x x

टाळ्यांच्या गजरांत तूं खालीं बसलास. तुझ्या अखेरच्या वाक्यानं जनसागर हेलावून गेला. तुझे ते शेवटले शब्द, 'प्रीति ही कित्येकांना धुंदींत ठेवणाऱ्या मदिरेप्रमाणें वाटते. पण माझ्या मतें ती मृतांना अमर करणाऱ्या संजीवनीसारखी आहे. मला आज यशाचे दान देणारी—' इतक्यांत श्रोतृवृंदांतून 'कोण? तुमची ती यशोधरा कोण?' असा आवाज आला. पण टाळ्यांच्या गजरांत तो विलीन झाला.

तुझ्यापुढील मेजावर कलाबुतींत गुंफलेला गेंदेदार फुलांचा हार पडला होता. त्यांतील एकदोन पाकळ्या खुडून तूं त्यांचा आस्वाद घेत होतास. संस्थेचे आणखी एक हितचिंतक बोलावयास उठले. ते म्हणाले, 'मला राहवत नाहीं म्हणून मी बोलून घेतों. आजचे वक्ते श्री. नीलकंठ महाशब्दे यांनीं आपल्यापुढें 'माझ्या जीवनांतील क्रांतीचे क्षण' या विषयावर तासभर जें अस्खलित भाषण केलं, त्यावरून तुम्हांला त्यांच्या अनुभूतीचं क्षेत्र किती विशाल आहे, हें दिसून आलं असेल. महाशब्दे यांच्या कित्येक शब्दांना महान् अर्थ आहे. त्यांत मानवी अंतःकरणांना स्पर्श करण्याचं सामर्थ्य आहे.

'हिमालयासारखी शतकाशतकांची तपस्या हातून घडल्याशिवाय लक्षावधि जीवांचें जीवन होणारी गंगा निर्माण करतां येणार नाहीं,' हे नील-कंठांचे उद्गार एखाद्या हारांतील कंठमण्याप्रमाणें माझ्या स्मरणात राहातील.'

'वंदे मातरम्' झाल्यावर चाहत्यांच्या वलयांत तूं दिसेनासा झालास. संकोचशील स्त्रिया तुझ्याशीं कांहीं बोलतां आलं तर पहावं या हेतूनं अवतीभंवतीं रेंगाळत होत्या. आणि मी—तुझ्या दृष्टीनं मृतांना संजीवन देणारी मी—मुख्य दरवाजापाशीं गळ्यांतील एकदाणीचे मणी ओंठांनीं चाळवीत उभी होतें. हेतु हा कीं मला पाहून तूं आश्चर्यचकित होऊन विचारावंस,

'आँ! यशोधरे, तूं इकडे कुठं?'

आणि मग मीं उत्तर द्यावं, 'जेथें माझा कंठमणि सिद्धार्थ, तेथें मी.'

× ×

## ४९. गालबोट

तुझ्याजवळ यायला मला अजूनहि भीति वाटते. कां, तें कोण जाणे. पण तुझ्या वागणुकींत अशी एक छटा आहे कीं, त्यामुळें कोणत्याहि स्त्रीनं तुझ्याशीं विवक्षित

अंतरावरून बोलावं, चालावं. हिमालयासारख्या धीरोदात्त गिरिरायाच्या उदरांत उगम पावणाऱ्या जान्हवीनंच महासागराचं पाणिग्रहण करावं; श्रीहरीच्या स्पर्शांनीं श्यामल झालेल्या यमुनेनं तें करूं नये, असं मला वाटतं. तुझ्या चेहऱ्यावर सदैव गांभीर्याचं अधिष्ठान असतं, मनांत कसल्यातरी ब्रह्मानंदाची समाधि लागलेली असते. ह्या मनोवृत्तीचा उगम आहे तरी कशांत हें पहाण्याचा योग मला—मीं त्या दिवशीं तुझे डोळे झांकले त्या क्षणीं आला.

तूं आरामखुर्चीत पहुडला होतास. हातांत अर्धेच पान लिहून झालेली तुझी दैनंदिनी होती. छताला लटकलेल्या कोळिष्टकांच्या धाग्यांची गुंतागुंत न्याहाळीत असलेल्या तुझ्या डोळ्यांत संध्या-छाया लपंडाव खेळत होत्या. तुझे ओंठ हंसत होते. अशा वेळीं मी खोलींत केव्हां आलें याची चाहूल तुला न लागलेली पाहून मीं तुझे डोळे झांकण्याचा धीर केला. त्या धिटाईनें तुझ्या दैनंदिनींत लिहिलेला एक सुखद विचाराचा ठेवा मला मिळाला. मीं वाचलं तें असं होतं:—

'आंसवांच्या गंगा-तीरीं फुललेल्या प्रीतीचं कधीं-कधींहि निर्माल्य होणार नाहीं. निसर्गानं फुलविलेल्या फुलांचं भवितव्य पंचमहाभूतांच्या लहरीवर अवलंबून

असतं. पण एकदांच फुललेलं आणि कधींहि न कोमेज-णारं आपलं प्रीति–पुष्प इंद्रानं आपल्या नंदनवनांत नेऊन ठेवावं इतक्या मोलाचं आहे.'

ज्या तुझ्या हिऱ्यांच्या डोळ्यांनीं हें अक्षर सत्य लिहिलं, ज्या तुझ्या उत्कट मनानं त्यांत जीवनाचं सौंदर्य ओतलं, त्या डोळ्यांना आणि मनाला अंधारांत ठेवून मीं तें वाचलं, आणि—

आणि काय? मला समाधान झालं असेल? खरं म्हटलं तर मी हर्षानं वेडी व्हायला पाहिजे होतें. पण नाहीं! त्या क्षणापासून मी दुःखानं कढत आहें! तुझ्या एकाच स्पर्शानं मोहरून जाण्याची इच्छा करणारी मी....तो कायमचा मिळणार हें कळतांच निर्माल्यवत् झालें. कां होणार नाहीं? तुझ्याबरोबर मिरवितांना हा माझ्या वैभवाचा टिळा म्हणून तुझा नामनिर्देश करण्याचं सोडून यापुढें तुझ्या त्या अक्षय्य प्रीतीच्या आठवणीचं गालबोटच मला मिरवावं लागेल. माझ्यांतील सौंदर्य चिरंजीव राहावं म्हणून तूं मला गालबोट लावलंस; पण आज, संसाराच्या आदर्शांत पहातांना मला मी कशीशीच दिसत आहें, त्याचं काय?

× ×

ज्या वयांत तूं मला भेटलीस त्या वयांत कुणाचाच देह आसक्तीच्या गंधानं भारला जात नाहीं आणि डोळे सौंदर्याच्या लालित्यानं वेडावत नाहींत. तरी पण माझ्या मनाची तूं त्या क्षणींच पकड घेतलीस. तेव्हांपासून आजपर्यंत—

प्रीतीचे पहिले अनुबंध नेहमीं तुलनेच्या निरगांठीनं सांधलेले असतात. तुझ्या मनोनिर्मित सौंदर्यास उपमान शोधून काढण्यासाठीं मी कल्पनेच्या अस्मानी पंखांवर बसून ब्रह्माण्डाचा फेरफटका करून आलों आहें. चिटाच्या परकर-पोलक्यांत फुल-पांखराच्या गतीनं विहार करणारी तुझी छबी परसांतील बागेंत फुलं खुडतांना पाहिली कीं मी गोविंदाग्रजांच्या कवितेंतील 'माझें मग तें फूल कोणतें, कसें ओळखूं सांग?' हा चरण गुणगुणत असें. वाढत्या वयाबरोबर बीजेच्या कोरीसारख्या तुझ्या देहयष्टीचं पौर्णिमेच्या चंद्रांत रूपांतर झालेलें मला दिसलं आणि माझ्या दृष्टींत चकोराची आर्तता आली. संध्येच्या काजळत्या अंधारांत सायंतारा दिसूं लागल्यापासून उषःकालचे रुपेरी किरण आकाशाच्या निळ्या सागरात स्नानसंध्येसाठीं उतरेपर्यंत मी तुझ्या गुंगींत असें.

तुझ्या चौरस कपाळावरील कणीदार कुंकू, भरदार उरोजांना भिडणारे खणाच्या चोळीचे कांठ, बोलतांना मध्येंच करांगुलि दातांत धरतांना तिच्यांतील अंगठींत लकाकणारा डाळिंबी रंगाचा खडा, या साऱ्या गोष्टींनीं माझ्या मनाचा आजपर्यंत वेध घेतलेला आहे! प्रीतीच्या प्रांतांत सलोकतेकडून सरूपतेकडे जाण्याची एक वाट आहे; पण ती अत्यंत कंटकमय असल्यामुळं फारच थोड्यांच्या पावलांनीं ती मळलेली आहे. त्याच वाटेवरील मी एक यात्रिक आहें. भविष्यकाळांतील एखादी घटका झेपावत माझ्याकडे येईल आणि ती माझं जीवन सुवर्ण-मय करील, या एकाच आशेवर मीं आजवरचा मार्ग आक्रमिला व पुढला आक्रमीन.

× ×

## ५१. संध्या - छाया

मनांत येतं तें सारंच तुला सांगतां आलं असतं तर.... पण सारं जरी नाहीं, तरी जीवनांतल्या कांहीं घटका मात्र तुझ्या संगतींत घालवाव्याशा वाटतात...अगदीं तीव्रतेनं माझ्या मनाला तसं वाटतं. तूं पुरुष आहेस. सायंकाळच्या तुझ्या उदास घटका उत्सुकतेनं घरीं परत-

णाऱ्या पक्ष्यांच्या दर्शनानं तुला तरल करतां येतील. निशेच्या अंगणांत पसरलेल्या नक्षत्रांचा सडा दुःखानं भारलेल्या तुझ्या मनाला दिलासा देईल. अवसेच्या अंधारावर देखील तूं आपल्या भाव लहरींचीं सुवर्ण-वलयं उमटवूं शकशील. रोजच्या जीवनांतील इतका वेळ तूं सर्वस्वीं तुझा असतोस. पण—दिवसाच्या व्यवहारांत घटकाभरच काय ती मी माझी असतें. ती घटका सायं-तनींची.

संध्याछाया समोरच्या घराच्या कौलावरून सरकूं लागल्या कीं कर्तव्याच्या गुंगींतून मला जाग येते. ती घटका मी उंबरठ्यांत उभी राहून काढतें. मावळत्या सूर्याच्या काजळत्या प्रकाशांत आकाशाच्या सरोवरांत एकेक तारका तरंगूं लागली कीं सारं माझेपण तुझ्या स्वरूपांत विलीन होतं. मनांत येणाऱ्या अनेक भावनांचे अवशेप त्या संध्याछायेंत विरघळून जातात. पहांटेच्या जागत्या स्वप्नांत माझ्या विरहानं तुझ्या पापण्यांवर तरं-गळणारे अश्रू अरुणाची किरणशलाका येऊन पुसून टाकते आणि मला विसरून नव्या जोमानं तूं कामाला लागतोस. पण रात्रभर त्या छायेची श्यामलता माझ्या मनाच्या अवकाशांत तरळत राहते.

× ×

एकटी असलें कीं माझ्या मनांत नेहमीं विचार येई कीं, 'तूं माझ्याकडे कां येतोस?' लोक समजत तसं मात्र मी समजत नव्हतें. कारण मी जाणून आहें कीं अभिलाषा पुरी करून घ्यायचीच झाली तर तुला अनेक दिशा आहेत, वेगळे मार्ग आहेत. हिमाचलाचा पंथ चुकलाच तर राजहंस एखाद्या पुष्करिणीकडे वळेल, पण तो पल्वलाकडे वळला तर....? तूं जो मला विचार करायला लावतोस तो ह्याच कारणास्तव. आणि तुझा विचार करून करून आज मी त्या विचारांच्या पलीकडे गेलेली आहें.

परवां जातांना तूं म्हणालास, 'मेघांच्या उरीं विसांवणाऱ्या जल-बिंदूंना चिरंजीव होण्यासाठीं आपलं पतन करून घ्यावं लागनं. मातीला देखील मायेचा ओलावा मिळला तर चार-दोन महिन्यांत तिच्या कटि-पोटीं मोत्यांच्या मोलाचे तुरे फुलूं लागतात. मग तूं स्वतःला कमी कां लेखतेस? माझ्या सान्निध्याचा....' शेवटले शब्द तुला पुरे करतां आले नाहींत. अभिषेकपात्राप्रमाणं पापण्यांच्या छिद्रांतून पाझरणारे तुझ्या हृदयांतील भाव-बिंदु माझ्या पायांवर ठिबकत होते. त्या स्पर्शांनीं माझे

पाय पवित्र झाले आहेत. त्यांनीं उजळून निघालेलीं हीं जोडवीं मीं तेव्हांपासून काढून ठेविलीं आहेत. कारण जगाची धूळ पुन्हां तिच्यावर बसली तर मी ती कशानं उजळूं? माझ्या स्पर्शासाठीं आपलं पतन करून घेणारा तूंच एकटा मला भेटलास. कधींकाळीं का होईना, पण श्रावणसरीप्रमाणं तूं माझ्याकडे येतोस म्हणून माझं जीवन फुलेरलं आहे. नाहींतर ही मृत्तिका अंतरिक्षाच्या विशाल अवकाशांत वावटळीच्या वेगानं केव्हांच उधळून लाविली गेली असती!

x x

## ५३. गुंतवळ

ती आणि मी एकाच निवासांत राहात होतों. ती माझ्या वरच्या मजल्यावर होती. त्यामुळं जेव्हां जेव्हां ती माझ्या खोलीसमोरील जिन्यावरून एखाद्या मंदाक्रांतेसारखी जाई, तेव्हां तेव्हां मी तिच्याकडे अनिमिष नेत्रांनीं पहात असें. तिची ती नितंबाच्या खालीं उतरलेली लांबसडक केसांची वेणी, संस्कृत नाटककारांनीं केलेल्या नायिकेच्या वर्णनाप्रमाणं नितळ गोरी त्वचा आणि कर्ण-कुंडलांकडे कटाक्षाने पाहणारे डोळे पाहिले म्हणजे

वाटे कीं, हिचा व आपला परिचय असता तर—तिच्या सहवासांत विरागी जीवनांतील जडावलेले क्षण परागा-प्रमाणं हलके झाले असते.' पण माझी भावना आमच्या भाषेच्या वेगळेपणामुळं अवघडली होती. कित्येकदां जिना चढतां-उतरतांना आमची कटाक्षांची देवघेव होई. अशीं अनेक वर्षं गेलीं. यौवनाचं शिखर गांठलेला आमचा रथ उताराला लागलेला होता. सरत चाललेल्या सुखद प्रवासाची मनाला तीव्रतेनं जाणीव होत होती. अशाच अवस्थेंत मला कांहीं महिने बाहेरगांवीं जावं लागलं.

आणि फिरून मीं खोली उघडली तेव्हां....हमरस्त्या-वरून वेगानं धांवणाऱ्या वाहनानं उधळलेला धुरळा सबंध खोलीभर झाला होता. झुरळांच्या लाल सैन्यानं आपलं विध्वंसक कार्य पुष्कळसं पार पाडलं होतं. कपाटावरील पट्टीवर एक भली मोठी पाल अभिमानानं त्या सैन्याची टेहळणी करीत उभी होती. ह्या साऱ्यांची विल्हेवाट लावतांलावतां मी गवाक्षाची खिडकी उघ-डली....तोंच माझ्या दृष्टीस एक गुंतवळ पडलं. एऱ्हवीं 'केशव'रावांकडे किळसवाण्या दृष्टीनं पाहणाऱ्या 'मी'नं तें हातांत घेतलं आणि न्याहळिलं. त्यांत एक पांढरा केस मला दिसला. मला एकदम माझ्या मंदाक्रांतेची

आठवण झाली आणि मनांत आलं: 'इतकीं वर्षं आम्हीं परस्परांशीं न बोलतां काढलीं; माझ्याप्रमाणं तिलाहि माझ्याबद्दल कांहींच का वाटलं नसेल?—वाटणारच! पण तेंच भाषेचं बन्धन तिलाहि आड आलं असावं. आमच्यांत भाषेचा भिन्नपणा नसता तर हिरवळलेल्या यौवनाचा आठ-दहा वर्षांचा काळ आम्हीं असा करपूं दिला नसता.' हे भाव मनांत खेळत असतांनाच मीं वरच्या मजल्यावर जाऊन तिच्या खोलीकडे पाहिलं, तों मला ती बंद असलेली दिसली. निराश मनानं मी खालीं आलों आणि तें गुंतवळ वाऱ्यावर फेकून दिलं. पण काळाच्या अवकाशांत अदृश्य झालेले आमचे यौवनाचे अनुपभुक्त क्षण—तें काजळलेलें जीवन—अजूनहि मन विषण्ण करतात. आतां जेव्हां एखाद्या कामिनीच्या उफाळलेल्या केसांचं गुंतवळ मी पाहतों तेव्हां त्यांत पांढरा केस आहे कीं नाहीं हें निरखिल्याशिवाय मी राहत नाहीं!

× ×

मैत्रिणींच्या वलयांत मी 'मदालसा' या नांवानं ओळखिली जातें! त्या नांवामागं असलेल्या मिस्किल-पणानं कधीं कधीं मी जरी चिडत असलें, तरी मला खराखुरा आनंद होतो तो त्याच नांवाच्या उल्लेखांत. माझ्या वर्तुळाकार बिलोरी आरशासमोर मी उभी राहिलें कीं भिवयांच्या भाषेंत त्या बोलूं लागतात आणि म्हण-तात, 'प्रीति असावी तर अशी'. त्यांच्या या बोलण्यांत जरी असूयेचा दर्प असला तरी खरं आहे तें....

वेषभूषेच्या निमित्तानें घटका-घटका मी आरशासमोर रेंगाळत राहतें. त्यांत प्रतिबिंबित झालेल्या माझ्या निष्कलंक अवयवांवरून नजर फिरवितांना तूं माझ्या डोळ्यांसमोर असतोस. तुझ्या स्पर्शानं माझीं सारीं गात्रं उमललेलीं आहेत. तुझ्या तेजानं तीं कांतिमान् झालेलीं आहेत. कधीं फुलांप्रमाणं तर कधीं वज्राप्रमाणें असणारं तुझं व्यक्तिमत्त्व त्यांनीं झेललं आहे, पेललं आहे!

माझी त्वचा अशी नखशिखान्त मखमाली राहण्याचं कारण तूंच. तुझ्या प्रेमाचं कवच माझ्याभोंवतीं नसतं तर जीवनांत हरघडी होणाऱ्या आघातानं मी रक्तबंबाळ झालें असतें; विव्हळलें असतें. म्हणूनच चार-चौघांत

सौंदर्याच्या ताठ्यानं वागणारी मी तुझ्यापुढें विरतें-संकोचतें. कधीं साशंक झालेलं मन स्वतःलाच प्रश्न करतं, 'अभंग प्रेमाचं हें कवच जीवनाभोंवतीं असंच राहील ना?'

× ×

## ५५. इन्द्रधनुष्य

घनमालेचा पहिला स्पर्श पर्वताच्या सर्वांत अत्युच्च शिखराला होत असतो. वाऱ्यावर इतस्ततः हेलकावणारी तिची काया त्याच्या चुंबनासाठीं ओथंबते, खालीं येते. आणि मग दोघांच्या मीलनांतून परिसर हिरवळून येतो.

ज्या ज्या वेळीं माझं मन अशी उंची गांठतं तेव्हां तेव्हां तुझं ऊर माझ्यावरील आपुलकीनं भारलेलं मीं पाहिलं आहे. माझ्या एकान्तांतील असह्य घटकांना तूं आपल्या सहानुभूतीनं कुरवाळिलं आहेस. माझ्या जीवन-वस्त्राची किनार तुझ्या अश्रूंनीं भिजलेली आहे.

जग म्हणतं, 'याचं आयुष्य इंद्रधनुष्यासारखं आहे.' तसं तें असेलच तर त्याचं श्रेय माझ्याइतकंच मी तुलाहि देतों. कारण इन्द्रधनुष्याचं अस्तित्व जसं माझ्या कर्त-व्याच्या किरणांवर अवलंबून आहे, तसंच तें तुझ्या

अंतरींच्या स्नेह-बिंदूवरहि आहे. केवळ कर्तव्याचा रंग धवलगिरीच्या शिखरासारखा असेल, पण माझ्या स्पर्शासाठीं जेव्हां तूं भारावून लवतेस तेव्हां....त्याच घटकेला माझं मन सप्तरंगानं चितारलं जातं.

x x

## ५६. हिरकणी

कष्टमय जीवनांत एखाद्या अलभ्य वस्तूचा लाभ झाला तर आपण ती जिवापलीकडे जपून ठेवतों. ती आपल्या दृष्टिआड झाली तर आपल्याला कसंसंच होतं. आणि जवळ असून कित्येक वर्षं आपण तिचा उपयोग करीत नाहीं.

माझ्या जीवनांत तुझा प्रवेश अनपेक्षितपणें झाला. तुझ्या तेजग्राही व्यक्तिमत्त्वाच्या स्पर्शानं मी कणाकणांतून फुलून निघालों. मीं स्वतःला 'तुझा' म्हणवून घेण्यांत भाग्य मानूं लागलों. पण ह्याची कल्पना मीं तुला शब्दानं मात्र दिली नव्हती.

एके दिवशीं तूं नि मी एकटीं—अगदीं एकटीं होतों. मी म्हणालों, "आज मला वेगळंच वाटतं आहे." तूं माझं डोकं वक्षःस्थळीं घेऊन माझी अंगठी चाळवीत म्हणालीस, "अस्सं काय? हें वेड बरं नव्हे." परंतु हें

बोलतांना माझं वेड अस्थानीं नव्हतं, हें तुझ्या हाल-चालीवरून मला कळत होतं. तुला 'हा आपला असावा' असं वाटत होतं. पण....माझी असायला तूं माझी नव्हतीस हें मी जाणत असून सुद्धां मला तुझ्या सान्निध्यांत वेगळंच वाटतं आणि तूं ह्या भावनेला वेड म्हणतेस. पण खरं सांग, तुझंही वेड तेंच नाहीं का? मग त्याला वेड तरी कां म्हणून म्हणायचं? जीवनाच्या चढ-उतारांवरून जातांना, दऱ्या-खोऱ्यांतील कांटेकुटे तुडवितांना दोघांच्या एकाच क्षणीं दृष्टीस पडलेली ती एक हिरकणी आहे. तिच्यामुळं आपलं—निदान माझं तरी--जीवन मोलाचं झालं आहे. यापुढं तें तसं होणार नसेल, तुझ्या म्हणण्याप्रमाणं खरोखरच हें वेड बरं नसेल तर मला त्याच हिरकणीचा ऐहिक जगांतील अखेरचा क्षण म्हणून उपयोग करूं दे.

× ×

## ५७. उत्कंठिता

अगदीं काल--परवांपर्यंत मला कसल्याच रंगाची आवड अशी नव्हती. तसे सर्वच रंग मला खुलून दिसत. लहानपणापासून घरांतील साऱ्यांची मी आवडती

असल्यामुळं कपड्यांचा उणेपणा मला कधींच भासला नाहीं. तऱ्हेतऱ्हेचीं पोलकीं आणि पातळं मला वापरायला मिळत. आणि सारेच रंग सर्रास वापरल्यामुळं माझ्या वापरण्यांत खास असा कोणता रंग नव्हता.

अनेकजण माझं कौतुक करीत, त्यांत तूंहि एक होतास. पण तुझ्या कौतुकांत सूचकता होती. 'कविता आणि ललिता यांच्या वेषभूषेंत ध्वन्यर्थ असेल तरच रसिकांच्या मनाला त्या दिलासा देऊं शकतील' ह्या तुझ्या परवांच्या वाक्यानं मी विरलें; कारण त्यांत तुझी विमनस्कता प्रतिबिंबित झाली होती. कांहींतरी वेगळंपण तुला माझ्यांत दिसलं असावं, हें मीं ओळखलं. त्या गुंगींत तुला स्वतःचा, स्वतःच्या कर्तृत्वाचा, नात्या-गोत्याच्या माणसांचा--साऱ्या साऱ्यांचा विसर पडे. माझ्यावरील नितान्त प्रेमांत तुझे क्लेश विरत होते--विरघळत होते. तूं मोकळेपणानं माझ्याजवळ बोलूं लागलास कीं मी संकोचून जातें; माझीं गात्रं नि गात्रं तुझ्या शब्द-माधुर्यानं मोहरून जातात, मी अबोल होतें. मला वाटतं, 'केवढी ही माझी पुण्याई? भिकारणीच्या भाव-गीतानं वेडावून गेलेल्या राजानं तिला राजवाड्यांत नेऊन माणिक-मोत्यांचा नजराणा द्यावा तसं माझं झालं आहे!'

—आणि परवां सायंकाळीं जेव्हां तूं अस्मानी रंगाचं

पातळ घेऊन माझ्याकडे आलास, तेव्हां तुझी आवड मला समजली. 'ध्येयाचा रंग अस्मानी असतो' हें तुझं वाक्य मला आठवलं. त्या पातळाच्या घडींत एक चिठ्ठी होती. तींत लिहिलं होतं: 'जिच्या निरंतर सहवासाची सुरेंद्रांनीं देखील अपेक्षा करावी ती सौंदर्यशालिनी ह्या अस्मानी रंगांत मला कधीं पहावयास मिळेल का?'

पण पातळ दिल्या दिवसापासून तुझी–माझी भेट नाहीं! तूं आतां कधींच का येणार नाहींस? ये! माझं सौंदर्य द्विगुणित व्हावं म्हणून नेणतेपणीं त्याग करणाऱ्या माझ्या निशिनाथा, तुझ्या अस्मानी रंगांत मला पहावयास ये! तुझ्यासाठीं मी उंबरठ्यांत उभी आहें. कालांतरानं वस्त्राबरोबर मनाचेहि धागे विरल होतात. तेव्हां ये! ललितेच्या जीवन-संगीतांतील ध्वन्यर्थ जाणणाऱ्या रसज्ञा, तुझ्यावांचून हें रंग-रूप व्यर्थ आहे. उत्कंठितेच्या अंतरींची आर्तता जाणल्यावर तरी तिला अशी तळमळत ठेवूं नकोस!

× ×